
दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे



Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३४४ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

गोध्रा जळीतकांड प्रकरणातील दोषींची शिक्षा स्थगित

सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय



वृत्तसंस्था, नवी दिल्ली

२००२ साली गुजरातमधील गोध्रा मध्ये झालेले ट्रेन जाळण्यात आल्याच्या काळ्या आठवणी अजूनही देशातील जनतेच्या मनात ताज्या आहेत. याच प्रकरणात सोमवारी (२३ नोव्हेंबर) सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान एक मोठा निर्णय दिला आहे. गोधरा जाळण्याच्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या एका दोषीची शिक्षाच रद्द करण्यात आली आहे. न्यायमूर्ती एम. एम. सुंदेश आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. ही याचिका प्रामुख्याने आरोग्याच्या कारणास्तव दाखल करण्यात आली होती. दोषींची प्रकृती लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाने त्याची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत.

बार अँड बेंचने दिलेल्या माहितीनुसार, खंडपीठाने आपल्या आदेशात नमूद केले की, याचिकाकर्त्याची विनंती प्रामुख्याने वैद्यकीय कारणांवर आधारित होती. राज्य सरकारच्या वकिलांनी मान्य केले की, दोषीच्या वकिलांनी मांडलेल्या आरोग्याच्या समस्या वस्तुस्थितीला धरून आहेत. या परिस्थितीचा विचार करता, न्यायालयाने वैद्यकीय कारणास्तव दोषीची शिक्षा स्थगित करण्याचा निर्णय दिला. सुनावणीदरम्यान, राज्य सरकारच्या वकिलांनी या प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित केले. त्यांनी स्पष्ट केले की, त्या प्रकरणाच्या गुणवत्तेवर कोणतेही भाष्य करत नाहीत; मात्र, वैद्यकीय कारणास्तव शिक्षा स्थगित करण्यास सरकारचा कोणताही आक्षेप नाही, असे त्यांनी पुन्हा एकदा नमूद केले.

गोध्रा जळीतकांड प्रकरणात संबंधित आरोपी इरफान सिराज पाडा हा गेल्या १८ वर्षांपासून जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. २००२मध्ये साबरमती एक्स्प्रेसला आग लावण्यात आली होती. यामध्ये एकूण ५९ कारसेवकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात जातीय दंगली भडकल्या होत्या. या प्रकरणात मार्च २०११ मध्ये ट्रायल कोर्टाने ३१ जणांना दोषी ठरवले होते. यापैकी ११ जणांना फाशीची, तर उर्वरित २० जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. इतर, ६३ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. २०१७ मध्ये गुजरात उच्च न्यायालयाने ११ दोषींची फाशीची शिक्षा जन्मठेपेत बदलली होती. उर्वरित २० दोषींची जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली होती. दोषींची अपील १०१८ पासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.

आतापर्यंत आरोपींना जामीन

इरफानला २०२५ मध्येही मुदतपूर्व सुटकेच्या मागणीवर राज्य सरकारने विचार करावा यासाठी अंतरिम पॅरोल मिळाला होता. दरम्यान, १३ मे २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दोषी अब्दुल रहमान धंतिया उर्फ कंकड्डो उर्फ जंबूरोला ६ महिन्यांचा अंतरिम जामीन दिला होता. त्याच्या पत्नीला कर्करोग झाल्याचे निदान झाले होते. त्यानंतर शेवटच्या टप्प्यात होता आणि त्याच्या मुली मानसिकदृष्ट्या दिव्यांग होत्या. ११ नोव्हेंबर २०२२ रोजी न्यायालयाने त्याचा जामीन ३१ मार्च २०२३ पर्यंत वाढवला होता. डिसेंबर २०२२ मध्ये आणखी एक दोषी फारूकला जामीन देण्यात आला.

न्यायालयाने त्याच्या प्रकरणात या बाबीचा विचार केला होता की, त्याने १७ वर्षांहून अधिक काळ तुरुंगात घालवला आहे. ट्रेनवर दगडफेक करण्यात त्याची भूमिका होती. त्यानंतर २१ एप्रिल २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आणखी ८ दोषींना जामीन दिला होता.

थोडक्यात

सोने दर घसरणीचा गोल्ड लोन कंपन्यांना फटका!

नवी दिल्ली : सोन्याच्या किमतीतील घसरणीचा परिणाम आता केवळ गुंतवणूकदार किंवा खरेदीदारांपुरता मर्यादित राहिलेला नाही तर गोल्ड लोन देणा-या कंपन्यांनाही त्याचा फटका बसू लागला आहे. मीडिया रिपोर्टनुसार सोने तारण ठेवून कर्ज घेताना संबंधित कंपनी तारणातील सोन्याच्या किमतीनुसार कजार्ची रक्कम ठरवते. मात्र, सोन्याचे दर मोठ्या प्रमाणात घसरल्यास तारण ठेवलेल्या सोन्याचे मूल्य कमी होते. त्यामुळे कर्जाच्या तुलनेत तारणाची सुरक्षितता कमी होऊन कर्जदार कंपन्यांची जोखीम वाढते.

याच पार्श्वभूमीवर काही गोल्ड लोन कंपन्या ग्राहकांकडे अतिरिक्त सोने तारण ठेवण्याची किंवा कजार्चा काही भाग परत करण्याची मागणी करीत आहेत. काही प्रकरणांमध्ये थकित कर्जाची वसुली करण्यासाठी तारण ठेवलेल्या सोन्याचा लिलाव करण्याची वेळही कंपन्यांवर येत आहे. इंडिया बुलेटिन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या आकडेवारी नुसार ९१६ शुद्धतेच्या सोन्याचा देशांतर्गत दर जानेवारीत प्रति १० ग्रॅम १.६१ लाख रुपयांच्या उच्चांकावर पोहोचला होता. मात्र, १९ नोव्हेंबरपर्यंत हा दर घसरून जवळपास १.१९ लाख रुपयांवर आला. म्हणजेच या कालावधीत सोन्याच्या किमतीत सुमारे २६ टक्क्यांची घट झाली.

नागपूर जिल्ह्यातील चिचोली येथे अपर तहसीलदार कार्यालय

सावनेर तालुक्यातील महसूल कामकाजाला मिळणार गती, प्रशासकीय कामांना गती देण्यासाठी महसूल विभागाचा निर्णय

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील चिचोली (खापरखेडा) येथे नवे अपर तहसीलदार कार्यालय कार्यान्वित करण्यास आणि त्यासाठी आवश्यक बाबींना महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने मान्यता दिली आहे. शासकीय कामकाजाचा वाढता व्याप, उपलब्ध अपुरा अधिकारी व कर्मचारीवृंद, भौगोलिक स्थान, वाढती लोकसंख्या आणि नागरीकरण विचारात घेऊन प्रशासन लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी तसेच नागरिकांना विविध सेवा सहज व जवळ उपलब्ध करून देण्यासाठी महसूलमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला.

नव्या शासन निर्णयानुसार, चिचोली (खापरखेडा) अपर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात चिचोली (खापरखेडा) या एका महसूल मंडळाचा समावेश राहील. तर सावनेर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सावनेर, खापा, केळवद, बडेगाव आणि पाटणसावंगी अशी एकूण पाच महसूल मंडळे कायम राहतील.

नव्या अपर तहसीलदार कार्यालयाचे कामकाज कार्यान्वित झाल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये असलेले सर्व अधिकार व कर्तव्ये नेमून दिलेल्या क्षेत्रासाठी वापरण्यात येतील. महसूली कामकाजाव्यतिरिक्त इतर बाबींचे अधिकार संपूर्ण तालुक्यासाठी मूळ तहसील कार्यालयाकडेच राहतील. निवडणूक, संजय गांधी निराधार योजना व इतर महसूलेतर कामकाजाबाबतचे अर्ज किंवा निवेदने प्राप्त झाल्यास ती स्वीकारून पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार कार्यालयाकडे पाठविण्याची तरतूद करण्यात आली आहे. अपर तहसीलदार, चिचोली (खापरखेडा) यांचे प्रतिवेदन अधिकारी म्हणून संबंधित उपविभागीय अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून नागपूरचे जिल्हाधिकारी काम पाहतील, तसेच अपर तहसीलदार हे कार्यालय प्रमुख असतील.

प्रसिद्ध ध्रुव राठी यांच्या अडचणी वाढल्या!



वृत्तसंस्था, नवी दिल्ली

प्रसिद्ध यूट्यूबर ध्रुव राठी यांच्या अडचणी पुन्हा एकदा वाढल्या आहेत. सोमवारी, २३ नोव्हेंबर २०२६ रोजी, दिल्लीतील साकेत जिल्हा न्यायालयाने २०१८ मधील फौजदारी मानहानीच्या एका प्रकरणात ध्रुव राठी यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. न्यायिक दंडाधिकारी प्रथम श्रेणी अनम रईस खान यांच्या न्यायालयाने, तक्रारदार विकास पांडे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना हा आदेश दिलाय. न्यायालयाने या प्रकरणातील पुढील सुनावणी ३ डिसेंबर २०२६ रोजी होणार आहे.

हा कायदेशीर वाद मे २०१८ मध्ये ध्रुव राठी याने यूट्यूबवर अपलोड केलेल्या एका व्हिडिओपासून सुरू झाला. भाजप आयटी सेल भाग-२ या व्हिडिओमध्ये राठीने असा आरोप केला होता की, भाजपच्या आयटी सेलने तक्रारदार विकास पांडे यांना लाच देण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान विकास पांडे यांनी या आरोपांना खोटे आणि निराधार असल्याचं म्हटले आहे. हे आरोप आपली प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने केल्याचा दावा त्यांनी केला आहे. विकास पांडे हे आय सपोर्ट नरेंद्र मोदी या सोशल मीडिया पेजचे संस्थापक विकास पांडे यांनी ध्रुव राठीच्या विरोधात न्यायालयात फौजदारी मानहानीचा खटला दाखल केला आहे.

नांदेड-नागपूर महामार्गावर कारने घेतला पेट

तिघे थोडक्यात बचावले



वृत्तसंस्था, नांदेड

नांदेड-नागपूर महामार्गावरील हादगाव तालुक्यातील बरडशेवाळा येथे धावत्या कारने अचानक पेट घेतल्याची घटना घडली. कारने अचानक पेट घेतल्याने महामार्गावर काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, कारमधील तिघांनी प्रसंगावधान राखत वेळीच बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याने मोठी दुर्घटना टळली असून तिघेही सुखरूप बचावले.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, नांदेड-नागपूर महामार्गावरून कार जात असताना बरडशेवाळा परिसरात अचानक कारमधून धूर येऊ लागला. काही क्षणांतच कारने पेट घेतला.

ही बाब लक्षात येताच कारमधील तिघांनी तातडीने कारमधून बाहेर पडत आपला जीव वाचविला. त्यानंतर आगीने कारला वेढा घातल्याने वाहनाचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

या घटनेमुळे महामार्गावरून जाणाऱ्या वाहनधारकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. कारला आग लागण्याचे नेमके कारण आणि वाहनाच्या नुकसानीचा तपशील समजू शकलेला नाही.

तुकडेबंदी कायद्याच्या जाचातून ५,००० नागरिकांना दिलासा!

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून, नागपूर परिसरातील ९ गावांमधील जमीन व्यवहार नियमित करण्याच्या प्रक्रियेला गती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

तुकडेबंदी कायद्यातील तरतुदींमुळे गेल्या अनेक वर्षांपासून जमीनविषयक अडचणींचा सामना करणाऱ्या नागपूर ग्रामीण परिसरातील सुमारे ५,००० नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून बेसा, बेलतरोडी, विहीरगाव, नरसाळा, हुडकेश्वर (बु.), बहादुरा, खरबी, गोन्ही सिम आणि कापसी खुर्द या ९ गावांमधील जमिनींच्या नियमितीकरणाच्या प्रक्रियेला महसूल प्रशासनाने गती दिली आहे.

या गावांमधील विविध लेआऊटमधील जमिनींचे हस्तांतरण तसेच तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणे अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. त्यामुळे हजारो भूखंडधारकांना खरेदी-विक्री व्यवहारांची नोंद, फेरफार नोंदी आणि अन्य महसुली कामकाज करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. परिणामी, अनेक नागरिकांना त्यांच्या जमिनींच्या मालकी हक्कासंदर्भातील महसुली नोंदी पूर्ण करून घेता येत नव्हत्या.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या कार्यपद्धतीच्या अनुषंगाने या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासनाने संबंधित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी कार्यवाही सुरू केली आहे.

या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते आणि तहसीलदार, नागपूर (ग्रामीण) अरविंद हिंगे यांनी संबंधित जमिनींच्या अभिलेखांची तपासणी करून महाराष्ट्र धारण जमीन तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण अधिनियमातील लागू तरतुदींनुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित तलाठ्यांना दिल्या आहेत.

या प्रक्रियेमुळे संबंधित ९ गावांमधील सुमारे ५,००० नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जमीनविषयक अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे. पात्र भूखंडधारकांच्या मालकी हक्काच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या जमिनींचे व्यवहार, महसुली नोंदी आणि मालकी हक्कासंदर्भातील अडचणी दूर करण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून महसूल प्रशासनाने केलेल्या या कार्यवाहीमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जमीनविषयक प्रश्नांच्या निराकरणाला गती मिळाली असून, नागपूर ग्रामीण परिसरातील ९ गावांमधील सुमारे ५,००० नागरिकांसाठी मालकी हक्काच्या नोंदी नियमित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राहुल नार्वेकरांनी आदिवासींच्या जमिनी लाटल्या

खासदार राऊतांचे आरोप; मुख्यमंत्र्यांना पत्र



वृत्तसंस्था, मुंबई

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर आदिवासींच्या जमिनी लाटण्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांनी सोमवारी (२३ नोव्हेंबर) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहित काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. अलिबागच्या म्हात्रोळी गावातील गरीब आदिवासींच्या जमिनी लाटण्याचा आरोप यावेळी पत्रातून करण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांनी तातडीची दखल घेत नार्वेकरांना तंबी द्यावी, अशी मागणी त्यांनी पत्रात केली आहे.पत्रात खासदार संजय राऊत म्हणाले आहेत की, संवैधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीने सार्वजनिक जीवनात वावरताना किमान मर्यादांचे पालन केले पाहिजे हे आपणही मान्य कराल. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या मनमानी वर्तनाविरोधात अलिबाग तालुक्यातील आदिवासी समाज गेल्या काही काळापासून आंदोलन करीत आहे व पोलिस यंत्रणा त्या आदिवासींवर जबरदस्ती करत त्यांना पळवून लावत आहेत. हे सर्व विधानसभा अध्यक्षांच्या दबावाखाली घडत असेल तर नार्वेकर यांना त्यांच्या पदावरून तत्काळ दूर करणे गरजेचे आहे. राहुल नार्वेकर आणि त्यांचे नगरसेवक भाऊ मकरंद यांनी गेल्या काही काळापासून अलिबाग तालुक्यात मोठ्या प्रमाणावर जमीन खरेदीचा सपाटा चालवला आहे. या सपाट्यातून गरीब आदिवासींच्या जमिनीही सुटलेल्या नाहीत. असा गंभीर आरोप त्यांनी यावेळी केला आहे.

राऊतांच्या आरोप तथ्यहिन; नार्वेकर

राऊत यांच्या आरोपांवर बोलताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, राऊतांच्या आरोपांवर काहीही तथ्य नाही. ज्या जमिनीवरून आरोप केले जात आहेत, ती आदिवासी जमीन नसून भोगवटा क्रमांक १ ची जमीन आहे. आदिवासींनी २०२४ पूर्वी केलेल्या सर्व तक्रारींचा निपटारा झाला आहे. झालेल्या तक्रारींमध्येही कुठेही नार्वेकर कुटुंबाचा नावाचा उल्लेख नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मत चोरण्याची परंपरा निवडणूक आयोगाच्या साथीने सुरू : नाना पटोले

नांदेड : जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा खासदार निवडून येतो आणि अवघ्या ४ महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार ४० ते ५० हजार मतांच्या फरकाने पराभूत होतात. या निकालांमागे मतचोरीची परंपरा असून, मोदी सरकारने निवडणूक आयोगाच्या साथीने ही परंपरा सुरू केल्याचा सणसणीत आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केला. लोकशाही व्यवस्था नष्ट करण्याचा गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केला.

येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी पटोले यांनी केंद्र सरकार, भाजप आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका केली. महाराष्ट्रासारख्या फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांच्या भूमीत लोकशाहीचा गळा घोटण्याचे पाप नरेंद्र मोदी आणि तत्कालीन निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केल्याचा आरोप त्यांनी केला.पटोले म्हणाले की, २०१९ ते २०२४ या ५ वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रात सुमारे ५० लाख मतांची वाढ झाली. म्हणजे प्रत्येक वर्षी सरासरी १० लाख मतांची वाढ झाली. मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या ४ महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात तब्बल ४६ लाख मते वाढली. ५ वर्षांत ५० लाख आणि केवळ ४ महिन्यांत ४६ लाख मते वाढण्यामागचे नेमके कारण काय? असाही प्रश्न त्यांनी यावेळी विचारला.

संपादकीय लेखणीतून...

दिपोत्सवः त्रिपुर पौर्णिमेचे वैशिष्ट्य

कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा किंवा त्रिपुरी पौर्णिमा म्हणतात. या दिवशी शिव मंदिरात त्रिपुर वात- उंच खांबावर असलेल्या दिव्याची वात लावली जाते. एकादशीपासून सुरू झालेले तुळशी विवाह करण्याचा हा शेवटचा दिवस असतो. बौद्ध धर्मात असे मानले जाते की कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी तथागत बुद्धांचा एक पट्टशिष्य धम्म सेनापती सारिपुत्राचे परिनिर्वाण झाले होते. या पौर्णिमेला बौद्धबांधव अष्टशीलांचे पालन व उपोसथ व्रत करतात. सर्व लहान थोर उपासक- उपासिका एकत्र जमून बुद्ध वंदना घेत धम्मोपदेश श्रवण करतात. शीख धर्मातही या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. शीख धर्माचे संस्थापक श्रीगुरू नानकदेव यांची या दिवशी जयंती साजरी केली जाते.

त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाने खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून शत्रूंपासून भय राहणार नाही असा वर मागून घेतला. या वरामुळे उन्मत्त होऊन तो सर्व लोकांना व देवांनासुद्धा खूप त्रास द्यायला लागला. त्रिपुरासुराची तीन नगरे वेससून त्याला अभेद्य तट केला होता. त्यामुळे देवांनाही त्याचा पराभव करता येईना. देवांनी भगवान शंकराची अखेर प्रार्थना केली. तेव्हा शंकरांनी त्याची तिन्ही नगरे जाळून त्याला ठार केले. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे तिला त्रिपुरारी पौर्णिमा म्हटले जाऊ लागले. या दिवशी घरात घराबाहेर व देवळातही दिव्याची आरास करून पूजा केली जाते, तसेच नदीत "दीपदान" करून लोक आनंदोत्सव साजरा करतात. उत्तर भारतात या दिवशी स्कंद मूर्तीची पूजा करतात. दक्षिणेत या दिवशी कृत्तिका महोत्सव असतो. त्यात शिवपूजन केले जाते. या दिवशी भगवान विष्णू यांनी मत्स्यावतार घेतला, अशीही धारणा आहे. ब्रह्मनिष्ठ आत्मज्ञानी प.पू. बाळूमामा महाराज पुण्यतिथी सोहळा, श्री सत्य अविनाश पारख पद समाज जावली- वारूळ ता. शाहूवाडी जि कोल्हापूर येथेही सोहळ्याचे आयोजन असते.

या विशेष दिवशी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ भाविक देवाला अर्पण करतात. याला "अन्नकोट" असे म्हटले जाते. त्रिपुरी पौर्णिमेचे औचित्य साधून मंदिर आणि सार्वजनिक ठिकाणी दीपोत्सव साजरा करण्यात येतो. हे या दिवसाचे वैशिष्ट्य सांगता येते. मंदिरांमध्ये असलेल्या दगडी दीपमाळा या संध्याकाळी वाती लावून उजळल्या जातात. भाविक भगवान शंकरापुढे त्रिपुर वात लावून उत्सव साजरा करतात. कार्तिक पौर्णिमा, ज्याला त्रिपुरारी पौर्णिमा किंवा देव दिवाळी असेही म्हणतात. हा कार्तिक महिन्याच्या शुद्ध पक्षातील १५ व्या तिथीला साजरा होणारा महत्त्वाचा सण आहे. यंदा सन २०२६ मध्ये कार्तिक पौर्णिमा मंगळवार २४ नोव्हेंबर रोजी आहे. भगवान शंकराने त्रिपुरासुराचा वध केला, त्या विजयाप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. देव दिवाळी: या दिवशी देवांची दिवाळी साजरी केली जाते. अनेक ठिकाणी मंदिरे, घरे, अंगण आणि नदीघाटांवर दिव्यांची आरास केली जाते. काही परंपरांनुसार या दिवशी भगवान शिव, विष्णू आणि लक्ष्मीचे पूजन केले जाते. कार्तिक पौर्णिमेला तथागत बुद्धांचे पट्टशिष्य सारिपुत्र यांचे परिनिर्वाण झाले होते. या दिवशी उपोसथ व्रत, अष्टशीलांचे पालन आणि बुद्ध वंदना केली जाते.

पवित्र नदी किंवा जलाशयात स्नान करणे आणि गरजूंना अन्न, धान्य, कपडे किंवा उबदार वस्तूंचे दान करणे पुण्यप्रद मानले जाते. संध्याकाळी प्रदोष काळात घरात, मंदिरात किंवा नदी-तलावाकाठी दिवे लावले जातात. शिवमंदिरांमध्ये ३६५ वातींचा दिवा लावण्याचीही प्रथा आहे. शिवलिंगावर जलाभिषेक, पंचामृत अभिषेक, बेलपत्र अर्पण करणे आणि रात्री चंद्राचे दर्शन घेऊन अर्घ्य देण्याची परंपरा आहे. तारकासुराचा वध कार्तिकेयाने केल्यानंतर त्याच्या तीन मुलांनी- तारकाक्ष, कमलाक्ष आणि विद्युन्माली यांनी ब्रह्मदेवांची कठोर तपश्चर्या केली. ब्रह्मदेवांकडून त्यांनी असे वरदान मागितले की त्यांना तीन वेगवेगळी- सोने, चांदी आणि लोखंडाची फिरती शहरे मिळावीत, जी हजार वर्षांतून एकदाच एका रेषेत येतील आणि तेव्हाच एकाच बाणाने त्यांचा नाश होऊ शकेल.

या तिन्ही असुरांना एकत्रितपणे त्रिपुरासुर म्हटले जाऊ लागले. अमरत्वाचे वरदान मिळाल्याच्या गर्वाने त्यांनी तिन्ही लोकांत हाहाकार माजवला आणि देवांना स्वर्गातून हाकलून लावले. सर्व देव मदतीसाठी भगवान शंकरांकडे गेले. हजार वर्षे पूर्ण झाल्यावर जेव्हा ती तिन्ही नगरे एका सरळ रेषेत आली, तेव्हा शंकरांनी पृथ्वीचा रथ, सूर्य-चंद्राची चाके, मेरू पर्वताचे धनुष्य, वासुकी नागाची प्रत्यंचा आणि भगवान विष्णूंचा बाण बनवून एकाच बाणाने तिन्ही नगरे भस्म केले. त्रिपुरासुराचा वध कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी झाला.

सात फेऱ्यांमागील अब्जावधींचे अर्थचक्र : भारतीय विवाह अर्थव्यवस्थेची डिजिटल झेप

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारत देशात विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा किंवा दोन कुटुंबांचा भावनिक आणि सांस्कृतिक मिलनाचा सोहळा राहिलेला नाही, तर तो आता एक अत्यंत विशाल, गतिमान आणि गुंतागुंतीचा आर्थिक व्यवसाय बनला आहे. अलीकडच्या काही वर्षांत या व्यवसायाने एक अवाढव्य रूप धारण केले असून, आजमितीला या अर्थव्यवस्थेची उलाढाल तब्बल १३० अब्ज डॉलरच्या घरात पोहोचली आहे. देशाच्या एकूण सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (ज्याला स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हटले जाते) तुलनेत हा आकडा ३.२५ टक्के इतका प्रचंड आहे. यावरून देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यामध्ये विवाह सोहळ्यांचा किती मोठा वाटा आहे, हे सहज लक्षात येते. पारंपरिक विचारसरणीत विवाहाला एक पवित्र संस्कार मानले जाते, परंतु आधुनिक काळात त्याला सामाजिक प्रतिष्ठेचे आणि जीवनशैलीच्या प्रदर्शनाचे परिमाण लाभल्यामुळे या सोहळ्यांवर होणारा खर्च अभूतपूर्व प्रमाणात वाढला आहे. भारतीय विवाह अर्थव्यवस्थेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची व्यापक साखळी. एका विवाह सोहळ्याच्या निमित्ताने केवळ सोने-चांदी किंवा कपड्यांच्या बाजारपेठेलाच चालना मिळत नाही, तर तब्बल डझनहून अधिक संलग्न उद्योग आणि लाखो लहान-मोठ्या व्यावसायिकांचा उदरनिर्वाह त्यावर अवलंबून असतो. कापड गिरण्या, हातमाग विणकर, फुल उत्पादक शेतकरी, मंडप व सजावट कारागीर, छायाचित्रकार, वाद्यवृंद कलाकार, वाहतूक व्यवस्था, प्रवासी कंपन्या आणि आदरातिथ्य क्षेत्र या सर्वांनाच लग्नसराईत मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागातील असंघटित कामगारांसाठी हा काळ आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे विवाह हंगाम हा केवळ सांस्कृतिक उत्सवाचा काळ न राहता, देशांतर्गत मागणी आणि उपभोग वाढवणारा एक प्रमुख आर्थिक घटक बनला आहे.

या विशाल उलाढालीमागे सामान्य भारतीय कुटुंबांचा मोठा आर्थिक त्याग दडलेला असतो. भारतातील एका सामान्य विवाह सोहळ्याचा खर्च हा देशाच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा जवळपास पाच पटीने अधिक असतो. एवढा मोठा आर्थिक बोजा उचलणे सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी नेहमीच एक मोठे आव्हान राहिले आहे. हा खर्च भागवण्यासाठी भारतीय कुटुंबे अनेक दशके आधीपासूनच पैशांची काटकसर करून बचत करत असतात. तसेच, आपल्या देशातील घरांमध्ये सुमारे ३५,००० टन इतका सोन्याचा साठा पडून आहे. जेव्हा आयुष्यभराची बचत अपुरी पडते, तेव्हा लग्नाचा अवाढव्य खर्च पूर्ण करण्यासाठी याच सोन्याचा वापर करून सुवर्ण कर्ज घेण्याची किंवा नातेवाईक व सावकारांकडून उसने पैसे घेण्याची पारंपरिक पद्धत आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर रुजलेली आहे. या पद्धतीमुळे कुटुंबांना तात्काळ आर्थिक दिलासा मिळत असला तरी, अनेकदा उच्च व्याजदारामुळे आणि कर्जाच्या बोजामुळे कुटुंबाचे आर्थिक नियोजन दीर्घकाळ विस्कळीत राहते.

परंतु, आता या पारंपरिक आर्थिक समीकरणात अत्यंत वेगाने एक मोठा संरचनात्मक आणि डिजिटल बदल घडून येत आहे. तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे, स्मार्टफोनच्या उपलब्धतेमुळे आणि डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या सोयीमुळे लोक आता लग्नाच्या खर्चासाठी आधुनिक आर्थिक पर्यायांकडे वळत आहेत. १८ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या सद्यस्थितीनुसार आणि भारतपे या डिजिटल व्यवहार प्रणालीच्या ताज्या आकडेवारीनुसार, लग्नातील दागिन्यांची खरेदी, मंगल कार्यालय, भोजन व्यवस्था आणि सजावट यांसारख्या मोठ्या खर्चासाठी लोक रोख रकमेचा वापर करण्याऐवजी यूपीआय प्रणालीशी जोडलेल्या क्रेडिट कार्डचा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहेत. तसेच, एकाच वेळी मोठी रक्कम देण्याऐवजी ऑटो ईएमआय म्हणजेच सुलभ हप्त्यांच्या पर्यायाला लोकांची विशेष पसंती मिळत आहे.

या डिजिटल क्रांतीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कुटुंबांवरील एकरकमी खर्चाचा ताण आता मोठ्या प्रमाणावर हलका झाला आहे. मंगल कार्यालय चालक, दागिने विक्रेते, वस्त्रदालने आणि भोजन व्यवस्था पुरवणारे व्यावसायिक यांनाही आता डिजिटल प्रणालीद्वारे थेट क्यूआर कोड स्कॅन करून पैसे दिले जात आहेत. यामुळे मोठी बिले तीन ते १२ महिन्यांच्या सोप्या हप्त्यांमध्ये विभागली जात आहेत. पूर्वीच्या काळात अशा खर्चासाठी मुदत ठेवी, भविष्य निर्वाह निधी किंवा इतर दीर्घकालीन गुंतवणूकी वेळेआधीच मोडण्याची वेळ कुटुंबांवर येत असे, ज्यामुळे चक्रवाढ व्याजाचा मोठा तोटा सहन करावा लागत असे. मात्र, आता डिजिटल पतपुरवठ्यामुळे कुटुंबे आपली दीर्घकालीन गुंतवणूक अबाधित ठेवून लग्नाचे खर्च अधिक नियोजनबद्ध पद्धतीने हाताळू शकत आहेत.

हा बदल केवळ मोठ्या महानगरांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर द्वितीय आणि तृतीय श्रेणीतील शहरांमध्येही त्याचे स्पष्ट पडसाद उमटताना दिसत आहेत. पूर्वी अत्यंत असंघटित आणि रोख व्यवहारांवर आधारित असलेला हा विवाह उद्योग आता वेगाने औपचारिक अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात येत आहे. डिजिटल व्यवहारांमुळे प्रत्येक खर्चाची अधिकृत नोंद राहत असून, व्यावसायिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढली आहे. याचा दुहेरी फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला होत आहे. एकतर शासनाच्या कर महसुलात वाढ होण्यास मदत होत आहे आणि दुसरे म्हणजे, लहान-मोठ्या स्थानिक विक्रेत्यांचा डिजिटल व्यवहारांचा इतिहास तयार होत असल्याने त्यांना भविष्यात बँकांकडून व्यवसाय वाढीसाठी सुलभ कर्ज मिळणे अधिक सोपे झाले आहे.

मात्र, या वाढत्या डिजिटल आर्थिक विस्तारासोबतच आर्थिक साक्षरतेची आणि संयमाचीही नितांत गरज निर्माण झाली आहे. सुलभ हप्ते आणि तत्काळ पतपुरवठा यामुळे खर्चाचे नियोजन सोपे झाले असले, तरी सामाजिक देखाव्याच्या मोहात पडून क्षमतेपेक्षा अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती वाढण्याचा धोका नाकारता येत नाही. जर हप्त्यांचे आणि व्याजदराचे योग्य गणित मांडले नाही, तर आधुनिक डिजिटल सुविधाही मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी नव्या कर्जाच्या सापळ्याचे कारण ठरू शकतात. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करताना आपल्या उत्पन्नाची मर्यादा आणि परतफेडीची क्षमता यांचा समतोल राखणे प्रत्येक कुटुंबासाठी अत्यंत आवश्यक आहे.

भारतीय विवाह सोहळे आता रोख रकमेवर आधारित जुन्या पद्धतीकडून आधुनिक, पारदर्शक आणि डिजिटल आर्थिक मॉडेलकडे अत्यंत वेगाने मार्गक्रमण करत आहेत. परंपरा, संस्कृती आणि आधुनिक वित्तीय तंत्रज्ञान यांचा हा अनोखा संगम भारतीय अर्थव्यवस्थेच्या बदलत्या चेहऱ्याचे प्रतीक आहे. योग्य आर्थिक शिस्त आणि डिजिटल साधनांचा सुज्ञ वापर केल्यास ही १३० अब्ज डॉलरची विवाह अर्थव्यवस्था केवळ कुटुंबांच्या आनंदाचा सोहळा न राहता, देशाच्या शाश्वत आर्थिक विकासाला आणि रोजगार निर्मितीला नवी गती देणारे एक भक्कम इंजिन ठरेल, यात शंका नाही.

भारतीय विवाह अर्थव्यवस्था ही केवळ सांस्कृतिक परंपरेचा भाग नसून रोजगारनिर्मिती, व्यापारवृद्धी आणि देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणारे महत्त्वाचे क्षेत्र बनले आहे. डिजिटल व्यवहार आणि सुलभ वित्तीय सुविधांमुळे या क्षेत्राचे स्वरूप बदलत असले, तरी सामाजिक प्रतिष्ठेच्या स्पर्धेतून कर्जाचा बोजा वाढू नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. विवाहाचा खरा आनंद खर्चाच्या भव्यतेत नसून नात्यांतील प्रेम, विश्वास आणि आपुलकीत असतो. त्यामुळे परंपरेचा सन्मान राखताना आर्थिक शिस्त आणि डिजिटल सुविधांचा विवेकी वापर करणे, हाच भारतीय विवाह अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासाचा खरा मंत्र आहे.

- ९५६१५९५३०६

जगाला पर्यावरणासह पशुपक्षांच्या संरक्षणाची नितांत गरज

रमेश लांजेवार
नागपूर

जग विनाशाकडे वाटचाल करीत आहे. याकरीता जगाने पर्यावरण वाचविण्यासाठी संपूर्ण ताकदीनीशी पर्यावरणाचे संतुलन ठेवून संरक्षण करण्याची गरज आहे. वाढते प्रदुषण रोखण्यासाठी पृथ्वदपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. पर्यावरणाची सुरक्षा व संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रानी पर्यावरणाच्या प्रती वैश्विकस्तरावर आणि राजनीतीक व सामाजिक जागृती आणण्याकरिता संयुक्त राष्ट्राने २६ नोव्हेंबर १९९२ला "विश्व पर्यावरण संरक्षण दीवस" साजरा करण्याची सुरुवात केली. त्यामुळे संपूर्ण जगात २६ नोव्हेंबर विश्व पर्यावरण संरक्षण दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो.

आज संपूर्ण जग सुरक्षीत रहावे असे सर्वांना वाटते.परंतु विकासाच्या नावाखाली केंद्रित केले पाहिजे.

भारतात जंगल,पशु-पक्षी व प्राणी यांना सरकारकडून संरक्षण मिळावे यासाठी २६ मार्च १९७४ ला गढवाल मधील हेनवलघाटी येथे गौरादेवी यांच्या नेतृत्वाखाली "चिपको" आंदोलनास सुरूवात झाली व पर्यावरण संरक्षणाची मिसाल जागृत केली.आज तसे पाहिले तर स्थल, जल, वायु, आकाश-पाताळ मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाल्याचे दिसून येते. मानवाने जर पर्यावरणाला वाचविले तर जलप्रदुषण, वायुप्रदूषण व स्थल प्रदुषण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरपूर मदत मिळू शकते. आज पर्यावरणात मोठ्या प्रमाणात प्रदुषण दीसुन येते यामुळे मानवासह पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात विकासाच्या नावाखाली जंगल तोड मोठ्या प्रमाणात होत आहे. याचाच परीणाम पर्यावनावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो.

भारतासह जगातील वाढती लोकसंख्या ही पर्यावरण नियंत्रण ठेवण्यास मोठी अडचण असल्याचे मी समजतो. मानवाने आपल्या सुख-सुविधांसाठी पर्यावरणाकडे पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.आज पर्यावरणावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की "जगावं की मरावं" कारण आज पर्यावरणाचा आधारस्तंभ "वृक्ष"आहे व त्याला साथ हवी जल व वायूची परंतु हे संपूर्ण दुषित झाल्यामुळे पर्यावरण धोकादायक स्थितीत येवून पोहोचले आहे. असेही सांगण्यात येते की पर्यावरणाचा ढासळत्या परिस्थितीमुळे जगातील १० लाख प्राणी व वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.ज्या पक्ष्यांवर पर्यावरणाची धुरा आहे ते गिधाड पक्षी सुध्दा संपुष्टात येत आहे. मानवाने निसर्गावर एवढा अत्याचार केला की वृक्ष कटाईच केली नाही तर वृक्षांना जळमुळा सकट उपडुन फेकले.यामुळेच आज पर्यावरण मानवापासुन भयभीत झाले आहे.

आज औषधोपयोगी वनस्पती पर्यावरणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे नस्तनाबुत होत आहे. त्याचप्रमाणे अनेक औषधोपयोगी वनस्पती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील वाढत्या प्रदूषणामुळे ३० टक्के वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि विविध देशांतील १४२ प्रजाती आधीच पृथ्वीतलावरून लुप्त झाल्या आहेत ही अत्यंत चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.भारतात वृक्षांच्या २६०३ प्रजाती आहेत यातील ४६९ प्रजाती धोकादायक स्थितीत आहेत म्हणजेच भारतातही गंभीर समस्या आहे.आज पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे जंगलातील संपूर्ण प्राणी शहरात व गावात प्रवेश करतांना दिसतात यामुळे जिवीत हाणीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.यात हिंसक प्राणी शहरात व गावात प्रवेश करून मानव हानी व पाळीव प्राण्यांची हानी मोठ्या प्रमाणात होतांना दिसते.यामुळे जंगली प्राणी व मानव यांच्यात मोठ्या प्रमाणात शत्रुत्व दिसून येते.कारण जंगल संपदा नष्ट होत आहे यामुळे जंगलात रहाणारे पशु-पक्षी यांचे खान-पान ऐका-मेकांवर अवलंबून असते.परंतु जंगल तोडीमुळे अनेक प्राण्यांच्या व पक्षांच्या प्रजाती लुप्त होतांना दिसते किंवा त्यांची शिकार होतांना दिसते किंवा पर्यावणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे मृत्यूशी झुंज देतांना अनेक पशु-पक्षी दिसतात.

- ९९२१६९०७७९

भारताच्या पराभवाची खरी कारणमीमांसा ! पाकिस्तानविरुद्ध स्टार खेळाडूंची चमक फिकी; नियोजन, गोलंदाजी आणि फलंदाजीतील चुकांचा भारताला फटका

अभिषेकचे वादळ, तिलकचे शतक आणि शाहबाजचा संघर्षही व्यर्थ; पाकिस्तानने भारताला ४८ धावांनी धूळ चारली!

डॉ. दत्ता विघावे,
क्रिकेट समीक्षक

दोहा येथे झालेल्या आशिया चषक रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेतील भारत अ आणि पाकिस्तान अ यांच्यातील लढतीकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले होते. भारत-पाकिस्तान सामना म्हटला की प्रतिष्ठा, प्रतिष्ठेची लढाई आणि विजयासाठीची जिद्द या गोष्टी स्वाभाविकपणे महत्त्वाच्या ठरतात. मात्र, या सामन्यात भारतीय संघाला केवळ पाकिस्तानकडून पराभव स्वीकारावा लागला असे नाही, तर संघाच्या नियोजनातील त्रुटी, गोलंदाजीतील कमकुवतपणा आणि फलंदाजीतील विसंगतीही उघड झाल्या.

पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत ४९.२ षटकांत ३१३ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताचा डाव ४९.१ षटकांत २६५ धावांवर संपुष्टात आला. परिणामी पाकिस्तानने ४८ धावांनी विजय मिळवला. भारतीय कर्णधार तिलक वर्मानें १४९ चेंडूत १०० धावांची खेळी केली, तर अभिषेक शर्मानें अवघ्या ४२ चेंडूत ७० धावा ठोकल्या. शाहबाज अहमदने ४९ चेंडूत ५६ धावा केल्या. तरीही भारताला विजय मिळवता आला नाही. या तिन्ही खेळाडूंच्या योगदानानंतरही पराभव झाला, हीच भारतीय संघाच्या कामगिरीतील विसंगती अधोरेखित करणारी बाब आहे. या पराभवाचे विश्लेषण करताना केवळ एखाद्या खेळाडूला दोष देऊन चालणार नाही. कारण भारताचा पराभव हा एका चुकीचा परिणाम नव्हता, तर अनेक छोट्या-मोठ्या चुकांची एकत्रित परिणती होती.

सुरुवातीच्या सहा षटकांतच गोलंदाजीचे पितळ उघडे

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. त्यांचा हा निर्णय किती योग्य होता, हे सुरुवातीच्या सहा षटकांतच स्पष्ट झाले. पाकिस्तानच्या सलामीवीरांनी भारतीय गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवत अवघ्या सहा षटकांत बिनबाद ६४ धावा फटकावल्या. एकदिवसीय सामन्यात पहिल्या दहा षटकांत प्रतिस्पर्धी संघाला रोखणे अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र भारतीय गोलंदाजांना सुरुवातीपासूनच योग्य टप्प्यावर गोलंदाजी करता आली नाही. दिशा आणि टप्प्यावरील नियंत्रणाचा अभाव, फलंदाजांना मिळालेली मोकळीक आणि क्षेत्ररक्षणातील मयार्दा यामुळे पाकिस्तानने धावांचा वेग वाढवला. शमील हुसेनने २३ चेंडूत ३३ धावा केल्या, तर माज सदाकतने ६३ चेंडूत ५९ धावांची खेळी केली. सुरुवातीला पाकिस्तानला मिळालेली आक्रमक सुरुवात हीच पुढील मोठ्या धावसंख्येची पायाभरणी ठरली.

हर्षित राणाची आक्रमकता गोलंदाजीत दिसली नाही

हर्षित राणा हा भारतीय संघातील महत्त्वाचा वेगवान गोलंदाज. त्याच्याकडून प्रतिस्पर्धी फलंदाजांवर दबाव निर्माण करण्याची अपेक्षा होती. मात्र त्याने १० षटकांत तब्बल ७७ धावा दिल्या. मैदानावर प्रतिस्पर्धी फलंदाजांशी शाब्दिक चकमकी करण्यापेक्षा त्यांना आपल्या गोलंदाजीने उत्तर देणे अधिक महत्त्वाचे असते. या सामन्यात राणाचा आक्रमकपणा अनेकदा चाचेर्चा विषय ठरला; पण धावांवर नियंत्रण ठेवण्याचा बाबतीत त्याला अपेक्षित यश मिळाले नाही. विशेष म्हणजे, पाकिस्तानच्या फलंदाजांनी त्याच्या गोलंदाजीतील कमकुवत बाजू ओळखून आक्रमण केले. महत्त्वाच्या टप्प्यांवर धावा रोखण्यात अपयश आल्याने भारताला पाकिस्तानला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखता आले नाही.

हसन नवाज आणि फरहान यूसूफ यांनी भारतीय गोलंदाजीची परीक्षा घेतली

पाकिस्तानचा हसन नवाज हा भारताच्या पराभवातील प्रमुख घटक ठरला. त्याने ८२ चेंडूत ७९ धावा करत डावाला स्थैर्य दिले. त्याच्या खेळीत पाच चौकार आणि चार षटकांचा समावेश होता. दुसरीकडे, फरहान यूसूफने ४८ चेंडूत ५६ धावा करत अखेरच्या टप्प्यात धावांचा वेग वाढवला. मोहम्मद इम्रान रंधावाने अवघ्या १४ चेंडूत २३ धावा केल्या. भारताने एक वेळ पाकिस्तानचे पाच गडी २३० धावांवर बाद केले होते. या टप्प्यावर पाकिस्तानला २८० ते २९० धावांच्या आसपास रोखण्याची संधी होती. मात्र अखेरच्या षटकांमध्ये भारतीय गोलंदाजांना धावा रोखता आल्या नाहीत. पाकिस्तानचा डाव ३१३ धावांवर संपला. येथे भारताने किमान ३० ते ३५ धावा अधिक दिल्या, असे म्हणण्यास वाव आहे. कारण ३१४ धावांचे लक्ष्य आणि २८० धावांचे लक्ष्य यांच्यातील फरक केवळ आकड्यांचा नसतो; तो फलंदाजीच्या मानसिकतेवरही परिणाम करणारा असतो.

वैभव सूर्यवंशी आणि आयुष बदोनी यांची अपयशी सुरुवात

३१४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताला भक्कम सुरुवातीची गरज होती. वैभव सूर्यवंशी आणि आयुष बदोनी यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र दोघांनीही निराशा केली.

सूर्यवंशीने १३ चेंडूत ११ धावा केल्या, तर बदोनीला खातेही उघडता आले नाही. बदोनीला अली रझाने बाद केले. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्या काही षटकांत विकेट न गमावता धावा जमवणे महत्त्वाचे असते. मात्र भारताने सुरुवातीलाच दोन गडी गमावले. त्यामुळे मधल्या फळीवर अनावश्यक दबाव निर्माण झाला. वैभव सूर्यवंशीची आक्रमक फलंदाजी करण्याची क्षमता निर्विवाद असली, तरी प्रत्येक सामन्यात मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात विकेट गमावणे योग्य नाही. परिस्थितीनुसार खेळण्याची परिपक्वता त्याच्याकडून अपेक्षित आहे.

अभिषेक शर्माची फटकेबाजी आणि तिलक वर्माची संथ फलंदाजी

भारताच्या डावातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा यांची परस्परविरोधी फलंदाजी. अभिषेकने ४२ चेंडूत ७० धावा करत पाकिस्तानच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. त्याने सहा चौकार आणि सहा षटकार लगावले. त्याच्या फलंदाजीमुळे भारत विजयाच्या दिशेने वाटचाल करेल, अशी आशा निर्माण झाली होती. मात्र दुसऱ्या बाजूला कर्णधार तिलक वर्मालां धावा जमवण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. त्याने सुरुवातीच्या १७ चेंडूत केवळ दोन धावा केल्या. पहिल्या २८ चेंडूनंतरही त्याच्या धावांची गती अत्यंत संथ होती. याच ठिकाणी भारतीय फलंदाजीच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. ३१४ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी प्रत्येक षटकात साधारण साडेसहा धावांची आवश्यकता होती.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

मुलांना वाचनाची गोडी लावून त्यांच्यापर्यंत पुस्तके पोहोचवू या : किरण केंद्रे

बाल-कुमार साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मुलांना वाचते आणि लिहिते करू या. त्यांच्या हातात पुस्तके कशी जातील आणि पुस्तकांशी त्यांची गट्टी कशी जमेल, यासाठी प्रयत्न करू या. आजच्या मुलांचे प्रश्न, त्यांच्या गरजा आणि त्यांचे भावविश्व समजून घेऊन त्यांच्यासाठीचे बालसाहित्य निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक आणि बाल-कुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष किरण केंद्रे यांनी केले.

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, बाल कला अकादमी आणि विदर्भ सांस्कृतिक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित बाल-कुमार साहित्य संमेलनाचे उद्घाटन सोमवारी राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या गीतांजली बुटी यांच्या हस्ते झाले. यावेळी केंद्रे बोलत होते. मंचावर अभिनेत्री चिन्मयी सुमित, बाल कला अकादमीच्या अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष मधुरा गडकरी, स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस, प्राचार्या डॉ. रीता सोनटक्के, साहित्यिक प्रसेनजित गायकवाड, भूषण राक्षे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मुलांचे मासिकाचे संस्थापक-संपादक जयंत मोडक यांचा सन्मान करण्यात आला. तसेच प्रसेनजित गायकवाड यांच्या काय तसे मी करू? या बालकवितासंग्रहाचे आणि विशाल देवतळे यांच्या इवलसे सोनेरी कर्म या बालकादंबरीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.



केंद्रे म्हणाले, आजची मुले स्पष्टवक्ती, निर्भीड आणि प्रामाणिक आहेत. या पिढीवर विश्वास ठेवून पुढे जाण्याची गरज आहे. आपला सांस्कृतिक वारसा आणि संचित ही पिढी निश्चितच पुढे घेऊन जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

खऱ्या अर्थाने मुलांनीच आयोजित केलेले हे बाल-कुमार साहित्य संमेलन आहे, अशा शब्दात ज्येष्ठ नाट्याभिनेत्री चिन्मयी सुमित यांनी आयोजनाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, माझी आई मुलांचे मासिक वाचत असे. तिने माज्यामध्ये वाचनाची आवड निर्माण केली आणि पुढे किशोर मासिकाच्या माध्यमातून ही परंपरा पुढे नेली. आज या संमेलनामुळे बालपणीच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या आहेत. जयंत मोडक यांनी यावेळी मुलांचे मासिक शंभर वर्षांचे झाल्याचा उल्लेख केला.

मधुरा गडकरी यांनी प्रास्ताविकातून शिक्षण आनंदकेंद्रित असले पाहिजे या उद्देशाने बाल कला अकादमीतर्फे विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले.

दोन तास मोबाईलला सुट्टी

गीतांजली बुटी म्हणाल्या, बालक हा उद्याचा नागरिक असला, तरी आज त्याचे संरक्षण करणे आणि त्याचे हक्क जपणे ही पालक, शाळा, शिक्षक आणि समाजाची जबाबदारी आहे. मुलांच्या हातात मोबाईल देणे सोपे आहे; मात्र त्यांना योग्य डिजिटल संस्कार देणे कठीण आहे. शाळांमध्ये मुलांनी दोन तास टीव्ही आणि मोबाईल पाहू नये, यासाठी महाराष्ट्रभर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. बालक सुरक्षित राहिले तर कुटुंब, समाज आणि राष्ट्राचे भविष्यही सुरक्षित राहील, असे त्या म्हणाल्या.

सूत्रसंचालन वैदेही चवरे-सोईतकर हिने केले. आभार प्रदर्शन विशाल देवतळे यांनी केले. यावेळी मुशताक पठाण यांनी विद्यार्थ्यांना बालविवाहविरोधी शपथ दिली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

बालकांचे चित्रमयीने केले कौतुक

लहान मुलामुलींच्या लेझीम वादनाने बाल कुमार साहित्य संमेलनाचा प्रारंभ झाला. उद्घाटन सत्रानंतर नृत्य अरेंगम अकादमीच्या विद्यार्थीनींनी भरतनाट्यम सादर केले. त्यानंतर अंजुमन शाळेच्या छोट्या विद्यार्थ्यांनी कव्वाली सादर केली. चिन्मयी सुमीत यांनी या बालकलाकारांचे भरभरून कौतुक केले व त्यांचा सत्कार केला.

थोडक्यात

सावरगावात उद्या रंगणार 'जंगी शाहिरी दंगलीचा' कार्यक्रम!

व्यापारी संघटनेचा पुढाकार; महाराष्ट्रातील नामवंत शाहिरांच्या कलापथकांची राहणार विशेष उपस्थिती, सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जपणाऱ्या शाहिरी कलेचा आणि पारंपरिक लोकनृत्यांचा आनंद सावरगाव परिसरातील नागरिकांना अनुभवता यावा, या उद्देशाने समस्त व्यापारी संघटना, सावरगाव यांच्या वतीने मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य जंगी शाहिरी दंगल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सावरगाव येथील मेन रोडवर, त्रिमूर्ती ॲग्रो एजन्सीसमोर, बसस्थानक परिसरात सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत हा कार्यक्रम रंगणार आहे. या कार्यक्रमात मालापूर येथील न्यू गुरुसुहान मंडळाचे शाहिर शैलेश पाटील, सहशाहिर मोहन मडके तसेच राष्ट्रीय आजाद परशुराम खडी गम्मत मंडळ, सारडी (बु.), शाखा जांभोरा-पलटोरा, जिल्हा भंडारा यांचे सादरीकरण होणार आहे. दोन्ही मंडळांतील कलाकारांच्या माध्यमातून शाहिरी, लोकनृत्य, ढोलकी, डान्स आणि पारंपरिक लोककलेचे विविध आविष्कार सादर केले जाणार आहेत.

या कार्यक्रमासाठी समस्त व्यापारी संघटना, सावरगाव तसेच यशवंत कृपा डेकोरेशन अँड कॅटरिंग यांचे सहकार्य लाभले आहे. आयोजकांनी परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून या सांस्कृतिक कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे. लोककलेचा आनंद घेण्यासाठी सावरगावकरांना ही एक अनोखी पर्वणी ठरणार असून, या कार्यक्रमाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

चंद्रपुरात बुलेटचा फटाका आणि ऑटोची मनमानी पोलिसांच्या रडारवर : २६ वाहनचालकांवर कारवाई



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

शहरातील रस्त्यांवर कर्णकर्कश आवाज करीत धावणाऱ्या बुलेट आणि एसटी बसस्थानक परिसरात मनमानी पद्धतीने ऑटो चालविणाऱ्या चालकांना वाहतूक पोलिसांनी दणका दिला आहे. वाहतूक नियंत्रण शाखेने राबविलेल्या विशेष मोहिमेत १४ बुलेटस्वार आणि १२ ऑटोचालक अशा एकूण २६ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. बुलेटच्या मूळ सायलेन्सरमध्ये फेरबदल करून मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसविण्याचा प्रकार शहरात वाढत असल्याचे निदर्शनास आले होते. अशा बुलेटस्वारांकडून गर्दीच्या ठिकाणी मोठ्या आवाजात सायलेन्सर वाजविणे, स्टंटबाजी करणे असे प्रकार सुरू होते. दुसरीकडे, एसटी बसस्थानक परिसरात ऑटोचालकांच्या बेशिस्त वाहनचालविण्यामुळे प्रवासी आणि ज्येष्ठ नागरिक त्रस्त झाले होते.

नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त झाल्यानंतर २१ नोव्हेंबर रोजी वाहतूक नियंत्रण शाखेने विशेष पथकाच्या माध्यमातून कारवाईची मोहीम हाती घेतली. यात १४ बुलेटस्वारांविरुद्ध मोटार वाहन कायद्याच्या कलम १९८ आणि १९० (२) अन्वये कारवाई करण्यात आली. नियमबाह्य सायलेन्सर जप्त करून जागेवरच ते काढण्यात आले. तसेच कंपनीचे मूळ सायलेन्सर बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या. एसटी बसस्थानक परिसरात बेशिस्तपणे ऑटो चालविणाऱ्या १२ चालकांवरही विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारची विशेष मोहीम सुरू राहणार असल्याचे वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक अमोल बारपात्रे यांनी स्पष्ट केले आहे. वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन चंद्रपूर पोलीस दलाने केले आहे.

आदर्श पेट्रोल पंप चौकात नवीन हायमास्ट दिव्याचे लोकार्पण, ज्येष्ठ नागरिकांच्या रात्रीच्या प्रवासातील भीती दूर



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

शहरातील वर्दळीच्या आदर्श पेट्रोल पंप चौकात अखेर नवीन हायमास्ट लाईट उभारण्यात आला असून, १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता या प्रकाशव्यवस्थेचे उद्घाटन करण्यात आले. गेल्या दीड वर्षापासून कोमामध्ये असलेली चिमुकली शायरी पाटील आणि धर्मलता राकेश जैन यांच्या हस्ते हा हायमास्ट दिवा कार्यान्वित करण्यात आला.

आदर्श पेट्रोल पंप चौक हा मुख्य वाहतुकीमुळे नेहमीच गजबजलेला असतो. रात्रीच्या वेळी येथे पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने अपघाताची शक्यता निर्माण होत होती, तसेच मोकाट कुत्र्यांच्या त्रासामुळे विशेषतः रात्री ये-जा करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. ज्येष्ठ नागरिकांनी ही समस्या सामाजिक कार्यकर्ते तथा नगरसेवक अभिषेक डोईफोडे यांच्या निदर्शनास आणून दिली होती. नागरिकांच्या मागणीनंतर अभिषेक डोईफोडे यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून निवेदने दिली. त्यानंतर महानगरपालिकेच्या स्वच्छ निधीतून या हायमास्ट लाईटला मंजुरी मिळाली व काम पूर्ण झाले. सोयीसुविधांसोबतच प्रत्येकाच्या भावना आणि आनंद जपण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे डोईफोडे यांनी सांगितले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून नगरसेवक अभिषेक डोईफोडे, प्रकाश गुंडावर, पियूष जैन, विजय कोंकमवार, धर्मलता जैन, राकेश जैन, शायरी पाटील, देव पाटील, सचिन रामटेके, प्रमोद धुरड, महेश येरणे, नानाजी खवसे व बंटी राठोड यांची उपस्थिती होती.

मुलांमध्ये वारकरी संस्कृतीची रुजवणूक, भिवापुरात विशेष उपक्रम

नवनीत वारकरी भजन मंडळाचा पुढाकार, १० ते २० वयोगटातील मुला-मुलींसाठी प्रशिक्षण

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

आधुनिकतेच्या प्रवाहात पारंपरिक संस्कृती आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने येथील नवनीत वारकरी भजन मंडळाने मुला-मुलींसाठी विशेष प्रशिक्षण उपक्रम हाती घेतला आहे. याअंतर्गत १० ते २० वर्षे वयोगटातील मुला-मुलींना वारकरी परंपरेशी जोडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. येथील श्री क्षेत्र विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ७ ते ८ या वेळेत होणाऱ्या प्रशिक्षणात वारकरी दिंडी नृत्य, टाळवादन, मृदंग व पखवाज वादनाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासोबतच अभंग, हरिपाठ आणि पारंपरिक वारकरी संस्कृतीचे शिक्षणही दिले जाणार आहे. मुलांमध्ये भक्तिभाव, शिस्त, सांघिक भावना आणि आपल्या सांस्कृतिक परंपरेविषयी आवड निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. केवळ धार्मिक शिक्षणापुरता मर्यादित न राहता वारकरी संप्रदायातील कला आणि परंपरांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मुलांना मिळावे, यासाठी मंडळाने हा उपक्रम सुरू केला आहे.

या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी आनंद वारजूरकर, गजानन इंगोले, राम-कृष्णी कोहळे, निखिल बल्की आणि विलास कुंभरे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन नवनीत वारकरी भजन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. आपल्या पाल्यांमध्ये वारकरी संस्कृतीची आवड निर्माण करण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही मंडळाने केले आहे.

पीक कर्ज वाटपात दिरंगाई खपवून घेणार नाही; पात्र शेतकऱ्यांना तातडीने कर्ज द्या!

आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली नरखेड तालुक्यातील बँक व्यवस्थापकांची आढावा बैठक

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज उपलब्ध व्हावे, तसेच महाराष्ट्र शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली नरखेड तहसील कार्यालयात तालुक्यातील सर्व बँक व्यवस्थापकांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत शासनाच्या कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कर्जमाफीसाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांची माहिती, प्रलंबित प्रकरणे तसेच बँक स्तरावर येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी बँकांनी आवश्यक ती कार्यवाही तत्परतेने पूर्ण करावी, अशा सूचना आमदार चरणसिंग ठाकूर यांनी दिल्या.



यावेळी पीक कर्ज वाटपाच्या उद्दिष्टाचाही आढावा घेण्यात आला. अनेक शेतकऱ्यांना शेतीच्या हंगामासाठी वेळेत आर्थिक मदतीची आवश्यकता असते. त्यामुळे बँकांनी कर्ज प्रकरणे अनावश्यकपणे प्रलंबित ठेवू नयेत. कागदपत्रांची पूर्तता केलेल्या व पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्याने पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे. तसेच पीक कर्ज वाटपाचे निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश आमदारांनी बँक व्यवस्थापकांना दिले. शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज मिळविताना कोणत्याही प्रकारचा अनावश्यक त्रास होऊ नये, त्यांच्या अडचणींचे तातडीने निराकरण व्हावे आणि शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी बँका व प्रशासनाने समन्वयाने काम करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

या बैठकीला उपविभागीय अधिकारी पीयूष चिवंडे, तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष शामराव बारई, तहसीलदार भागवत पाटील, नगरपरिषद अध्यक्ष मनोज कोरडे, उकेश चव्हाण, राजेंद्र हरणे, स्वप्नील नागपुरे, संजय कामडे यांच्यासह तालुक्यातील विविध बँकांचे व्यवस्थापक व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज आणि कर्जमाफीचा लाभ मिळोपे ही प्रशासन व बँकांची जबाबदारी असून, यामध्ये कोणतीही दिरंगाई होऊ नये, असा ठाम संदेश या बैठकीच्या माध्यमातून देण्यात आला.

डॉ. भीमराया मेट्री, बॉलीवूड अभिनेत्री मुग्धा गोडसे आणि मॉडेल कृति वर्मा यांच्या उपस्थितीने 'डिझाइन हंट प्रदर्शनी २०२६'ची वाढली रंगत

प्रमुख पाहुणे आणि विशेष अतिथींकडून युवा डिझायनर्सच्या कलागुणांचे कौतुक; डॉ. भंवर राठोड यांनी नवोदित सर्जनशील प्रतिभेला दिली प्रेरणा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

फॅशन, कला आणि डिझाइन क्षेत्रातील सर्जनशीलता, नावीन्यपूर्ण संकल्पना आणि उदयोन्मुख प्रतिभेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने भंवर राठोड डिझाइन स्टुडिओ, नागपूर यांच्या वतीने रविवारी नक्षत्र बँक्वेट येथे 'डिझाइन हंट प्रदर्शनी २०२६'च्या पहिल्या आवृत्तीचे भव्य आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेट्री प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर बॉलीवूड अभिनेत्री आणि फॅशन आयकॉन मुग्धा गोडसे तसेच मॉडेल आणि एंटरटेनर कृति वर्मा यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या प्रदर्शनाला नागरिक, विद्यार्थी, नवोदित डिझायनर्स आणि डिझाइन क्षेत्रातील जाणकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध नामांकित फॅशन इन्स्टिट्यूट्स आणि विद्यापीठांनी या प्रदर्शनात आपले स्टॉल्स उभारले होते. यामध्ये त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमांची, विद्यार्थ्यांच्या सर्जनशील कलाकृतींची, नावीन्यपूर्ण डिझाइन संकल्पनांची तसेच शिक्षण आणि करिअरच्या विविध संधींची माहिती सादर करण्यात आली. फॅशन, कला आणि डिझाइन क्षेत्रातील करिअरच्या संधी जाणून घेण्यासोबतच विविध शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना या माध्यमातून मिळाली.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रमुख पाहुणे डॉ. भीमराया मेट्री यांनी नावीन्यपूर्ण विचार, समस्या निराकरण आणि व्यावसायिक विकासामध्ये डिझाइनची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. विद्यार्थ्यांनी सर्जनशील विचारशक्ती विकसित करावी, नवनवीन संकल्पना आत्मसात कराव्यात आणि विविध उद्योगक्षेत्रांमध्ये डिझाइनचे वाढते महत्त्व ओळखून उपलब्ध करिअरच्या संधींचा लाभ घ्यावा, असे प्रोत्साहन त्यांनी असे आवाहन त्यांनी केले.

मुग्धा गोडसे यांनी प्रदर्शनातील विविध स्टॉल्सना भेट देत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाकृती, कल्पकता, मौलिकता आणि नावीन्यपूर्ण डिझाइन संकल्पनांचे कौतुक केले. विविध शैक्षणिक संस्थांना आणि उदयोन्मुख सर्जनशील प्रतिभांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा आयोजकांचा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.



यावेळी कृति वर्मा यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या व्यावसायिक प्रवासातील अनुभव कथन केले. आत्मविश्वास, धाडस, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता आणि आपल्या ध्येयाप्रती असलेली जिद्द यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पारंपरिक संधींपलीकडे जाऊन नवनवीन क्षेत्रांचा शोध घ्यावा आणि स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून स्वप्नांच्या दिशेने वाटचाल करावी, असे प्रोत्साहन त्यांनी विद्यार्थ्यांना दिले.

या प्रसंगी भंवर राठोड डिझाइन स्टुडिओचे संस्थापक डॉ. भंवर राठोड यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचा उत्साह वाढवला. विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता अधिक विकसित करावी, सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करावीत आणि निवडलेल्या क्षेत्रात उत्कृष्टता संपादन करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे त्यांनी सांगितले. नवोदित डिझायनर्समधील कलागुणांना व्यावसायिक संधींमध्ये रूपांतरित करण्यासाठी योग्य मार्गदर्शन, अनुभव आणि व्यासपीठ उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थी, शैक्षणिक संस्था आणि सर्जनशील क्षेत्रातील व्यावसायिक यांच्यात संवादाचे प्रभावी व्यासपीठ निर्माण झाले. फॅशन आणि डिझाइन क्षेत्रातील बदलते प्रवाह, आधुनिक संकल्पना आणि भविष्यातील संधी यांची प्रत्यक्ष माहिती मिळविण्याची संधी युवा प्रतिभांना मिळाली.

रीना पांडे, हिमेश पांडे, सचित पांडे, मेधावी पांडे आणि श्रीमती वंशिका पांडे यांच्या नेतृत्वाखाली भंवर राठोड डिझाइन स्टुडिओ, नागपूर यांच्या वतीने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. युवा प्रतिभांना प्रोत्साहन देणे, गुणवत्तापूर्ण डिझाइन शिक्षणाचा प्रसार करणे आणि सर्जनशील कल्पनांना व्यावसायिक संधींशी जोडणारे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

मान्यवरांची उपस्थिती, विविध शैक्षणिक संस्थांचा सहभाग तसेच विद्यार्थी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे 'डिझाइन हंट प्रदर्शनी २०२६'ची पहिली आवृत्ती सर्जनशीलता, नावीन्य आणि युवा प्रतिभेच्या क्षमतांचा गौरव करणारा एक संस्मरणीय सोहळा ठरली.

विकास आराखड्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करा : जिल्हाधिकारी आशीर्वाद

नगरपरिषदांच्या विकासकामांना गती द्या, प्रस्तावांना तातडीने प्रशासकीय मान्यता घ्या

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद व नगरपंचायतींनी विकासकामांचे प्रस्ताव तातडीने सादर करून त्यांना प्रशासकीय मान्यता घ्यावी. मंजूर कामांची अंमलबजावणी वेगाने करावी तसेच विकास आराखड्यांना मंजुरी मिळविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

नगरपरिषद व नगरपंचायतींच्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, नगर प्रशासन विभागाचे सहआयुक्त विनोद जाधव



यांच्यासह सर्व नगरपरिषद व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करा

नगरपंचायतींमध्ये सुरू असलेल्या विकासकामांना मुख्याधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि विद्युत व्यवस्थेची कामे नियोजनानुसार व गुणवत्तापूर्ण पद्धतीने सुरू आहेत की नाही, याची खातरजमा करावी. कामांमध्ये त्रुटी आढळल्यास त्या तातडीने दूर कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

वाडी, हिंगणा, नरखेड व उमरेड नगरपरिषदांनी विकास आराखड्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा. बुटीबोरी व गोधनी नगरपरिषदांनी निवडणूक प्रभाग नकाशानुसार साक्षांकन करून प्रस्ताव सादर करावेत. रामटेक व मोवाड नगरपरिषदांनी जिल्हा नियोजन व विकास निधीअंतर्गत विकासकामांचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

बेसा-पिपळा, बहादुरा, बिडगाव व तरोडी नगरपंचायतींचे विकास आराखडे नगर रचना विभागामार्फत तातडीने कार्यवाही करून पूर्ण करावेत. येरखेडा नगरपंचायतीने विकास आराखड्यासंदर्भात १५ दिवसांत विद्यमान जमीन वापर नकाशा सादर करावा, असेही त्यांनी सांगितले. निलडोह, डिगडोह व कांद्री (कन्हान) नगरपंचायतींच्या विकास आराखड्यांना लवकरच प्रशासकीय मान्यता देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

पाणीटंचाई निवारणाच्या कामांना प्राधान्य द्या

पाणीटंचाई निवारणासाठी मंजूर झालेल्या कामांच्या निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना सुरुवात करावी. पेयजल टंचाई निवारणासाठी उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करावा. विधानसभा मतदार संघनिहाय लोकप्रतिनिधींशी चर्चा करून आवश्यक विकासकामांचे प्रस्ताव सादर करावेत. तसेच नियोजनातून प्राप्त झालेल्या निधीचा योग्य विनियोग करून पाणीटंचाई निवारणाची कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

थोडक्यात

गंगाबाई उपरीकर यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर



गंगाबाई कृष्णाजी उपरीकर यांचे आज सोमवार, दुपारी १२.४० वाजता दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा व अंत्यविधी उद्या, मंगळवार दिनांक सकाळी ९ वाजता निवासस्थान, मु. बोरी येथून निघेल. त्यांच्या मागे बराच मोठा आप्तपरिवार आहे.

संविधान दिनानिमित्त वाडीत प्रबोधनपर परिसंवादाचे आयोजन, मैत्रेय युवा संघ व यशोधरा महिला मंडळाचा उपक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

भारतीय संविधान दिनानिमित्त संविधानाचे महत्त्व व मूल्य घरोघरी पोहोचावे या उद्देशाने वाडी येथील मैत्रेय युवा संघ व यशोधरा महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने स्मृती ले-आउट दत्तवाडी येथील मैदानावर संध्याकाळी ६ वाजता भव्य प्रबोधन पर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या व्याख्यानमालेत संविधानाच्या गाढ्या अभ्यासिका एड. वैशाली डोळस, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य संघटक हरिदास पाथाडे व प्रख्यात वक्ते प्रा. जावेद पाशा हे तज्ञ वक्ते तसेच सामाजिक कार्यकर्ते धनराज बागडे, प्रणय रंगारी, राजू खोब्रागडे, राजकुमार बोरकर इत्यादी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. वाडी पत्रकार संघ कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत मैत्रेय युवा संघाचे अमित सुखदेवे, सुमेध गजभिये, धीरज थुल, मोहन इंगळे, कमलेश गजभिये, संदेश बडगे तर यशोधरा महिला मंडळाच्या रंजना सोनडवले, रजनीताई बागडे, रश्माला साखरकर, सुचित्रा चौखाद्रे, हर्ष गायकवाड इत्यादींनी संविधान दिवसाला संध्याकाळी सहा वाजता कार्यक्रम स्थळी उपस्थित करण्याचे आवाहन केले आहे.

दिव्यांगांप्रति सहानुभूती नको, हक्कांचा सन्मान करा!

तहसील कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी संवेदनशीलता कार्यशाळा; दिव्यांगस्नेही प्रशासनाचा संकल्प



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

दिव्यांग व्यक्तींना सहानुभूतीच्या चौकटीत न ठेवता त्यांना समान संधी, सन्मान आणि अधिकार मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, शासकीय यंत्रणेतील संवेदनशीलतेच्या अभावामुळे अनेकदा दिव्यांगांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. ही परिस्थिती बदलून दिव्यांगस्नेही प्रशासनाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या उद्देशाने भिवापूर तहसील कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी जागीव-जागृती आणि संवेदनशीलता कार्यशाळा घेण्यात आली. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्था, कुरखेडा संचालित समुदाय आधारित दिव्यांग पुनर्वसन प्रकल्पाच्या वतीने २३ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालयाच्या सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तलाठी, कोतवाल, मंडळ अधिकारी तसेच विविध विभागांतील कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. तहसील कार्यालयाचे सहाय्यक अधिकारी प्रशांत झाडे आणि तलाठी बकाडे यांची विशेष उपस्थिती होती.

दिव्यांगत्वाचे विविध प्रकार, त्यामागील कारणे, दैनंदिन जीवनातील अडचणी, सामाजिक भेदभाव आणि दिव्यांग व्यक्तींसमोरील आव्हाने यावर कार्यशाळेत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः दिव्यांग महिलांची सुरक्षितता, त्यांच्यावरील लैंगिक अत्याचार, स्वाभिमान आणि संपत्तीवरील अधिकार या गंभीर विषयांकडेही लक्ष वेधण्यात आले. दिव्यांग व्यक्तींशी संवाद साधताना योग्य भाषेचा वापर, त्यांच्या गरजांची जाणीव आणि सन्मानपूर्वक वागणूक यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी अडथळामुक्त वातावरण निर्माण करणे ही केवळ औपचारिकता नसून प्रशासनाची जबाबदारी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शासकीय दाखले, प्रमाणपत्रे आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळविताना दिव्यांगांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी महसूल यंत्रणेने सहकाचार्ची भूमिका घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. संजय गांधी निराधार अनुदान योजनेसह शासनाच्या विविध दिव्यांग कल्याणकारी योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याबाबतही चर्चा झाली. यावेळी उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही दिली. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रकल्प व्यवस्थापक संगीता तुमडे, जिल्हा समन्वयक प्रितम नानवटे आणि तालुका समन्वयक धम्ममाला टेटू यांनी परिश्रम घेतले.

पांडुरंगजी मेहर इनका निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्री भवानी माता सेवा समिति, श्री भवानी मल्टी स्पेशलिटी



हॉस्पिटल एंड रिसर्च सेंटर, श्री भवानी गौरक्षण, श्री भवानी कॉलेज ऑफ नर्सिंग के अध्यक्ष तथा पूर्व नगरसेवक पारडी निवासी पांडुरंगजी मेहर इनका दुःखद निधन सोमवार दिनांक २३ नवंबर को सुबह ३ बजे हुआ, उनका अंतिम संस्कार पांडुरंग घाम, पारडी घाट में किया जायेगा!

सावरगाव-मालापूर मार्गावरील नाली बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह!

काँक्रीट बांधकामावर पाणी मारण्याकडे दुर्लक्ष, नागरिकांची संबंधित विभागाकडे तपासणीची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सावरगाव-मालापूर मार्गालगत नाली बांधकामाचे काम सुरू आहे. मात्र, या बांधकामादरम्यान सिमेंट काँक्रीटच्या कामावर आवश्यकतेनुसार पाणी मारले जात नसल्याचा आरोप परिसरातील नागरिकांनी केला आहे. त्यामुळे सुरू असलेल्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

सिमेंट काँक्रीटचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याची मजबुती आणि टिकाऊपणा कायम राखण्यासाठी ठरावीक कालावधीपर्यंत नियमित पाणी मारणे अर्थात क्युरिंग करणे अत्यंत आवश्यक असते. या प्रक्रियेमुळे काँक्रीटला योग्य मजबुती मिळते आणि भविष्यात बांधकामाला तडे जाण्याची शक्यता कमी होते. मात्र, सावरगावझमालापूर मार्गावरील सुरू असलेल्या नाली बांधकामात या महत्त्वाच्या



प्रक्रियेकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी, भविष्यात नालीच्या मजबुतीवर आणि टिकाऊपणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शासकीय निधीतून होणारी विकासकामे दर्जेदार आणि टिकाऊ असणे अपेक्षित आहे. केवळ बांधकाम पूर्ण करण्यावर भर न देता प्रत्येक टप्प्यावर आवश्यक तांत्रिक निकषांचे पालन होणे गरजेचे आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष बांधकामस्थळी भेट देऊन कामाची पाहणी करावी. तसेच वापरण्यात येणारे साहित्य, बांधकामाची पद्धत आणि क्युरिंग प्रक्रियेची तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

इंजिनिअरला सांगूनही परिस्थितीत बदल नाही!

यासंदर्भात माजी उपसरपंच हंसराज गिरडकर यांनी सांगितले की, नाली बांधकामावर योग्य पद्धतीने पाणी मारण्यात यावे, यासाठी संबंधित विभागाच्या इंजिनिअरशी चर्चा केली होती. त्यावेळी त्यांनी ठेकेदाराला सांगण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर प्रत्यक्ष पाहणी केली असता बांधकामावर पाणी मारले जात नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

नागरिकांच्या प्रतिक्रिया :

सिमेंट काँक्रीटच्या बांधकामाची मजबुती टिकवून ठेवण्यासाठी ठरावीक कालावधीपर्यंत नियमित पाणी मारणे अत्यंत आवश्यक असते. मात्र, सावरगावझमालापूर मार्गावरील नाली बांधकामात या महत्त्वाच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे बांधकामाच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

- पुंडलिक माहुलकर
नागरिक, सावरगाव

नाली बांधकामावर योग्य पद्धतीने पाणी मारण्यात यावे, यासाठी संबंधित विभागाच्या इंजिनिअरशी चर्चा केली होती. त्यांनी ठेकेदाराला सूचना देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्ष पाहणी केली असता पाणी मारले जात नसल्याचे निदर्शनास आले. संबंधित विभागाने याकडे तातडीने लक्ष द्यावे.

- हंसराज गिरडकर,
माजी उपसरपंच, ग्रामपंचायत सावरगाव

नाली बांधकामाचा दर्जा चांगला राहण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमित पाहणी करणे आवश्यक आहे. शासकीय निधीतून होणारी विकासकामे दर्जेदार आणि टिकाऊ व्हावीत, यासाठी बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष देणे गरजेचे आहे.

- राजू रेवतकर
माजी सदस्य, ग्रामपंचायत सावरगाव

२७ नोव्हेंबरला वनामती येथे विशेष युवा संगीत सभेचे आयोजन

शास्त्रीय संगीतापासून फ्युजनपर्यंत युवा प्रतिभेचा सुरेल आविष्कार, युवा कलागुणांना मिळणार आकाशवाणीचे भव्य व्यासपीठ!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नवोदित आणि युवा कलाकारांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांना आपली कला सादर करण्याची हक्काची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आकाशवाणी नागपूर केंद्राच्या वतीने ह्यएअर रॉयझिंग स्टॉर- सेशन १ (२०२६) या विशेष उपक्रमांतर्गत भव्य युवा संगीत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता धरमपेठ, नागपूर येथील वनामती सभागृह येथे हा संगीत सोहळा रंगणार आहे. युवा पिढीतील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, नव्या कलाकारांना रसिकांसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळावी आणि भारतीय संगीताच्या समृद्ध परंपरेचा परिचय नव्या पिढीला व्हावा, या उद्देशाने आकाशवाणी नागपूरने हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या संगीत सभेच्या माध्यमातून शास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत, मराठी भावगीत आणि आधुनिक संगीताचा सुरेल संगम रसिकांना अनुभवता येणार आहे.

या कार्यक्रमात नवोदित युवा गायक आनंद चिमोटे हे शास्त्रीय गायन सादर करणार आहेत. तर ऋषिकेश करमरकर यांच्या दिलरुबा वादनातून भारतीय अभिजात वाद्यसंगीताची मधुर अनुभूती रसिकांना मिळणार आहे. सुगम संगीताच्या क्षेत्रातील तेजस्विनी खोडतकर या आपल्या सुरेल आवाजात मराठी भावगीतांची मेजवानी सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे आणखी एक प्रमुख आकर्षण युवा कलाकार शुभम चोपकर आणि संकेत माकोडे तसेच वाद्यवृंद यांच्या - बांसुरीवाला कलेक्टिव्ह म्युझिकल बँड च्या माध्यमातून फ्युजन संगीताचा अनोखा आविष्कार असणार आहे. पारंपरिक भारतीय संगीत आणि आधुनिक संगीतशैली यांचा सुंदर मिलाफ या सादरीकरणातून अनुभवायला मिळणार आहे.

या संगीत सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवानी दाणी-वखरे तसेच सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि जीवनकौशल्य प्रशिक्षक डॉ. संजय रघटाटे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. बदलत्या काळानुसार नव्या पिढीतील कलाकारांना प्रोत्साहन देत त्यांच्या कलेला व्यापक श्रोतेवर्गापर्यंत पोहोचविण्याचा आकाशवाणी नागपूरचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. एअर रॉयझिंग स्टॉर- सेशन १ हा उपक्रम युवा कलाकारांच्या कलाप्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र शासन भूजल विभागाच्या ई-निविदेवरून राज्यात खळबळ?

९० टक्के कंत्राटदारांची उच्च न्यायालयात धाव, निविदा प्रक्रियेतील अटींवर गंभीर आक्षेप

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या माध्यमातून रिचार्ज शाफ्ट व अन्य अनुषंगिक कामांसाठी राबविण्यात येणाऱ्या महसूल विभागनिहाय ई-निविदा प्रक्रियेवरून राज्यातील भूजल क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. निविदेतील जाचक अटी, तांत्रिक पात्रतेचे निकष, पाच लाख रुपयांची अनामत रक्कम, रोटरी मशीनची सक्ती आणि कंत्राटदारांच्या निवडीवर मयार्दा आणणाऱ्या अटींविरोधात राज्यातील सुमारे ९० टक्के भूजल कंत्राटदारांनी न्यायालयाचे दार ठोठावले आहे. या प्रकरणी नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल करण्यात आली असून, २५ नोव्हेंबर रोजी पहिली सुनावणी होणार असल्याची माहिती आहे.

निविदेतील अटींवर कंत्राटदारांचा आक्षेप

भूजल विभागाच्या ई-निविदा



प्रक्रियेत अनेक अटी व निकष अन्यायकारक असल्याचा कंत्राटदारांचा आरोप आहे. जिल्हा वार्षिक नियोजन समिती, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी तसेच जलयुक्त शिवार योजनेतून निधी उपलब्ध असतानाही निविदा प्रक्रियेचे अधिकार केंद्रित करण्यात आल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे.

प्रत्येक महसूल विभागातून केवळ सात कंत्राटदारांची निवड, पाच लाख रुपयांची अनामत रक्कम, रोटरी मशीनची सक्ती आणि एकच मॉडेल अंदाजपत्रक सर्वत्र लागू करण्याच्या अटींमुळे स्थानिक व अनुभवी कंत्राटदारांवर अन्याय होत असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे

कंत्राटदारांचे पाच प्रमुख आक्षेप

१. जिल्हा वार्षिक नियोजन समिती, खनिज निधी आणि जलयुक्त शिवार योजनांचा निधी उपलब्ध असतानाही अधिकारांचे केंद्रीकरण.

२. प्रत्येक महसूल विभागातून केवळ सात कंत्राटदारांची निवड करण्याची अट.

३. पाच लाख रुपयांची अनामत रक्कम अन्यायकारक व बेकायदेशीर असल्याचा आरोप.

४. रोटरी मशीनची सक्ती तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असल्याचा दावा.

५. सर्व जिल्ह्यांसाठी एकच मॉडेल अंदाजपत्रक लागू करण्यास विरोध.

कंत्राटदारांच्या प्रमुख मागण्या काय?

कंत्राटदारांनी निविदा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि जिल्हानिहाय परिस्थितीचा विचार करून राबविण्याची मागणी केली आहे.

-जिल्हास्तरावर मंजूर आराखड्यानुसार निविदा प्रक्रिया राबवावी.

- कंत्राटदारांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि समाधानकारक कामांची संख्या विचारात घ्यावी.

- अनामत रक्कम व आर्थिक उलाढालीचे निकष नियमांनुसार निश्चित करावेत.

- प्रत्येक जिल्ह्याची भौगोलिक व तांत्रिक परिस्थिती लक्षात घेऊन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करावीत.

- स्थानिक अनुभवी कंत्राटदारांना समान संधी उपलब्ध करून द्यावी.

२५ नोव्हेंबरला नागपूर खंडपीठात काय होणार?

या प्रकरणातील सर्वांचे लक्ष आता नागपूर खंडपीठातील पहिल्या सुनावणीकडे लागले आहे. सहा महसूल विभागांसाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेतील अटी, जिल्हास्तरीय आराखड्यांचा अभाव, कामांच्या किमतींबाबतची अनिश्चितता, कंत्राटदारांची मर्यादित निवड आणि पाच लाख रुपयांची अनामत रक्कम या मुद्द्यांवर न्यायालयात प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे.

९० टक्के कंत्राटदार एकवटले; पाच वर्षे कामापासून वंचित राहण्याची भीती

६ नोव्हेंबर २०२६ रोजी पाणीपुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून जारी करण्यात आलेल्या शासन परिपत्रकासह ई-निविदा प्रक्रियेला आव्हान देण्यात आले आहे. राज्यातील सुमारे ९० टक्के भूजल कंत्राटदारांनी एकत्र येत नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केल्याचे वृत्त आहे. निविदेतील अटी आणि शासन परिपत्रकाचा फायदा मोजक्याच मोठ्या एजन्सींना होईल, तर स्थानिक व अनुभवी कंत्राटदारांना पुढील पाच वर्षे कामापासून वंचित राहावे लागेल, अशी भीती कंत्राटदारांनी व्यक्त केली आहे.

न्यायालयाच्या निर्णयाकडे राज्यातील कंत्राटदारांचे लक्ष!

भूजल क्षेत्रातील कंत्राटदारांचा रोजगार, स्थानिक पातळीवरील कामांच्या सोयी आणि निविदा प्रक्रियेतील पारदर्शकता या सर्व मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर हे प्रकरण महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे २५ नोव्हेंबर रोजी नागपूर खंडपीठात होणाऱ्या सुनावणीत काय घडते आणि न्यायालय या निविदा प्रक्रियेबाबत कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण राज्यातील भूजल कंत्राटदारांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

चंद्रशेखर बावनकुळे यांना देशगौरव प्रतिष्ठानतर्फे १ लक्ष रूपयांचा निधी सुपूर्द

दुष्काळग्रस्त भागासाठी बेसा-पिपळा वासियांचा पुढाकार



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिपावलीच्या पावनपर्वावर औचित्याने दिपावली मिलन कार्यक्रम बेसा पिपळा नगरपंचायत परिसरातील शाम मार्ट जवळील अथर्व सिटी येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला चंद्रशेखरजी बावनकुळे महसूल मंत्री व पालकमंत्री नागपूर व अमरावती जिल्हा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच यावेळी त्यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात देशगौरव प्रतिष्ठानच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त परिस्थिती पाहता मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये एक लक्ष रुपये निधी महसुल मंत्री यांना सुपूर्द करण्यात आला. देशगौरव प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध स्पर्धात्मक उपक्रम राबविण्यात आले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम नरेश भोयर उपनगराध्यक्ष, बेसा पिपळा नगरपंचायत व अध्यक्ष देशगौरव प्रतिष्ठान यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी हभप चारुदत्त मोडक सचिव देशगौरव प्रतिष्ठान, अंकुश धाडसे कोषाध्यक्ष देशगौरव प्रतिष्ठान, विनोद कनोजिया सदस्य देशगौरव प्रतिष्ठान, तुषार सालवटकर सदस्य देशगौरव प्रतिष्ठान, नितीन दाटकर, अमोल धनुस्कर पंत उपाध्यक्ष देशगौरव प्रतिष्ठान यांनी परिश्रम घेतले.

जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त तीन दिवसीय श्री दत्तयाग महोत्सवाचे आयोजन

२८ ते ३० नोव्हेंबरदरम्यान विविध धार्मिक, आध्यात्मिक कार्यक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

प.पू.सद्गुरू श्री जनार्दन स्वामी खेर यांच्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त प.पू.सद्गुरू श्री जनार्दन स्वामी खेर सेवा मंडळ, नागपूरच्या वतीने २८, २९ व ३० नोव्हेंबर रोजी तीन दिवसीय श्री दत्तयाग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. माधव नगर येथील प.पू. माधवराव गोळवलकर समाधीगृहात हा महोत्सव भक्तिभावाने साजरा होणार असून, या निमित्त विविध धार्मिक, आध्यात्मिक व भक्तीपर कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, शनिवार २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ६.३० या वेळेत काकड आरती, ७.१५ ते ८ वाजता हरिपाठ, ८.३० ते ९.३० वाजता अल्पोपहार, तर सकाळी १० ते १२.३० या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते १२.३० या वेळेत श्री दत्तयाग, दुपारी १२.३० ते २.३० महाप्रसाद, दुपारी ३ ते ४ चहा व सायंकाळी ४ ते ४.३० या वेळेत सायबर सुरक्षा या विषयावर तज्ज्ञ मंडळींकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत प.पू. गुरुदेव श्री. शंकर अण्णा, पुणे यांचे पसायदान व विषयावर प्रवचन रविवार, २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ६.३० काकड आरती, ७ ते ८ अल्पोपहार, सकाळी १० ते १२ श्री दत्तयाग, आयोजित करण्यात आले आहे.

सायंकाळी ७ ते ७.३० या वेळेत विवेकानंद मेडिकल मिशन हॉस्पिटल, खापरी येथील गरजू रुग्णांच्या पेसमेकर खरेदीसाठी अर्थसहाय्य करण्यात येणार असून, मानवतावादी उपक्रमातून सामाजिक सेवाही जपली जाणार आहे. सायंकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत प.पू. स्वामींच्या जीवनचरित्रावर आधारित गोड- गोड गोष्टी चे सादरीकरण श्री. किशोर गालगुंडे आणि सी.आसावरी देशपांडे, नागपूर यांच्या माध्यमातून होईल. रात्री ९.३० ते १०.३० प्रसाद वितरणाने दिवसाची सांगता होणार आहे. दिनांक ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते १२ श्री स्वामींची उपासना नागपूर सेवा मंडळातर्फे सादर करण्यात येईल दुपारी १२ ते १.३० दत्तयागाची पूर्णाहुती होईल व त्यानंतर दुपारी १.३० ते ४ महाप्रसाद, सायंकाळी ४ ते ५ चहा व त्यानंतर त्रिदिवसीय उत्सवाची सांगता करण्यात येणार आहे.

मराठी भाषेचे पालक होण्याची गरज : चिन्मयी सुमित

बालकुमार साहित्य संमेलनातील लहानग्या कौमुदीने घेतली मुलाखत

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

आपण केवळ या सृष्टीची लेकरं आहोत, असे म्हणत आयुष्य जगणे पुरेसे नाही. आता आपल्याला या सृष्टीचे, पर्यावरणाचे, भाषेचे, आपल्या परिसराचे आणि संस्कृतीचे पालक होण्याची गरज आहे. आपण जे बोलतो, ते प्रत्यक्ष जगतो आहोत की नाही, याचे आत्मपरीक्षण प्रत्येकाने केले पाहिजे, असे प्रतिपादन अभिनेत्री चिन्मयी सुमित यांनी केले.

बाल-कुमार साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित संवादात्मक मुलाखतीत त्या बोलत होत्या. कौमुदी साल्पेकर या लहानग्या कौमुदी साल्पेकर हिने अतिशय आत्मविश्वासाने चिन्मयीला प्रश्न विचारून त्यांना बालपणीच्या आठवणी, कलाक्षेत्रातील प्रवास, नाटकाची निवड, पालकत्व, मराठी माध्यमातील शिक्षण आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभाव अशा अनेक विषयावर बोलते केले.

सहावीत असताना वक्तृत्व स्पर्धेत मिळालेल्या पारितोषिकामुळे आत्मविश्वास वाढला. मराठीच्या शिक्षिका गानू बाईंनी दिलेले प्रोत्साहन त्यांच्या कलाविश्वातील वाटचालीसाठी महत्त्वाचे ठरले. घरातील संगीत आणि नृत्याचा वारसा असूनही भाषेची आवड आणि साहित्याशी असलेले नाते यामुळे त्यांनी नाटकाची निवड केली, असे त्या म्हणाल्या.

आजच्या तरुण रंगकर्मींविषयी बोलताना त्या म्हणाल्या की, रंगभूमी म्हणजे केवळ अभिनय आणि संवादफेक नव्हे. प्रकाशयोजना, नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा आणि बॅकस्टेजची कामे यांचाही नाट्यप्रयोगात महत्त्वाचा सहभाग असतो. या सर्व प्रक्रियेतून तरुण कलाकारांना



रंगभूमीचा समग्र अनुभव मिळतो आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते. आजची तरुण पिढी अधिक तयारीनिशी या क्षेत्रात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सोशल मीडिया दमवणारा

सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना त्या म्हणाल्या की, आज कलाकारांच्या कामापेक्षा त्यांच्या फॉलोअर्सची संख्या महत्त्वाची ठरू लागली आहे. चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी रील्स, पोस्ट आणि विविध उपक्रमांमध्ये कलाकारांना सहभागी व्हावे लागते. हा प्रकार दमवणारा आहे. प्रत्येक क्षणाचा अनुभव घेण्यापेक्षा त्याचा फोटो काढून सोशल मीडियावर टाकण्याकडे अधिक कल वाढला आहे. त्यामुळे पुस्तक वाचन, निवांतपणा आणि स्वतःसाठी वेळ काढणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मुलांना भाषेचा वारसा द्या

आपल्या मुलांना मराठी माध्यमाच्या शाळेत दाखल करण्यामागील भूमिका स्पष्ट करताना त्या म्हणाल्या की, त्यांची मातृभाषा आणि परिसराची भाषा मराठी असल्यामुळे मराठी माध्यमातून शिक्षण घेणे अधिक नैसर्गिक आणि आनंददायी होते. त्यांच्या कुटुंबात अनेक पिढ्यांनी मराठी माध्यमातून शिक्षण घेतले असून त्यातून कोणाचेही नुकसान झालेले नाही. आपल्या मुलांना भाषेचा वारसा द्यायचा होता. कवितांचा साठा, म्हणी आणि भाषेवरील प्रेम हीदेखील पुढच्या पिढीला द्यावी अशी संपत्ती आहे, असे त्या म्हणाल्या. भाषेच्या संवर्धनासाठी मराठी शाळा टिकवणे आणि मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

आज संमेलनात महत्वाचे

१ वाजता - बालकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर चर्चासत्र
२.३० वाजता - मला बोलायचे आहे विषयावर खुली चर्चा
३ वाजता - समारोप

सभाधीटपणा गरजेचा

तरुण पिढीला संदेश देताना चिन्मयी सुमित म्हणाल्या, कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सभाधीटपणा आवश्यक आहे. आपले विचार, आचार आणि उच्चार यांच्यात सुसूत्रता असली पाहिजे. संस्कृती, भाषा आणि समानतेविषयी बोलताना आपल्या वागण्यातही त्याचे प्रतिबिंब दिसले पाहिजे. चांगले काम करणाऱ्या व्यक्तींचे निरीक्षण करून त्यांच्या गुणांचा स्वीकार करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा, असे आवाहन त्यांनी केले.

संस्कृत बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर संस्कृत भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा, विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेविषयी आवड निर्माण व्हावी तसेच बालकलाकारांना अभिनयाच्या माध्यमातून संस्कृत भाषा सादर करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, (विस्तार सेवा मंडळ) रामटेक आणि संस्कृत भाषा प्रचारिणी सभा, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृत बालनाट्य स्पर्धा - २०२६ आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेला अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, हिंगणघाट, भंडारा, मौदा आणि नागपूर येथील विविध शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन उल्लेखनीय सहभाग नोंदविला आहे त्यामुळे स्पर्धेची प्राथमिक फेरी दि. २८ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर २०२६ या कालावधीत विविध ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे तसेच स्पर्धेचे आयोजन प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन स्तरांमध्ये करण्यात आले आहे.

प्राथमिक फेरीतून उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या १५ नाट्यचमूंची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या चमूंची अंतिम फेरी दि. ८ व ९ डिसेंबर २०२६ रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथे सकाळी ८.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत आयोजित करण्यात येणार आहे. या अंतिम स्पर्धेतील विजेत्या नाट्यचमूंना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची रोख पारितोषिके व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येतील. तसेच उत्कृष्ट अभिनय करणाऱ्या बालक व बालिकांना स्वतंत्र पारितोषिके व अभिनय प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. याशिवाय दिग्दर्शन, संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्य, रंगभूषा आणि वेशभूषा या तांत्रिक विभागांसाठीही स्वतंत्र पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व बाल कलाकारांना तसेच तांत्रिक सहकार्य करणाऱ्या व्यक्तींना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी ८ डिसेंबरला गोरबंजारा समाजाचा नागपुरात एल्गार

गोर सेना राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.संदेश चव्हाण यांचा आमरण उपोषणाचाही इशारा!



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गोरबंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीने पुन्हा एकदा जोर धरला आहे. या मागणीसाठी सकल गोरबंजारा समाजाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर ते नागपूर अशी भव्य आरक्षण रथयात्रा काढण्यात येणार आहे. ५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील सिडको बसस्थानक परिसरातील वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यापासून या रथयात्रेला सुरुवात होणार आहे.जालना, सिंदखेड राजा, मेहकर, मालेगाव, वाशिम, पुसद, दिग्रस, दारव्हा, यवतमाळ आणि वर्धा मार्गे प्रवास करत ही रथयात्रा ७ डिसेंबर रोजी नागपुरात दाखल होणार आहे. त्यानंतर नागपुरात होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान ८ डिसेंबर रोजी गोरबंजारा समाजाच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यानंतर धरणे आंदोलन आणि आमरण उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. गोरबंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. आरक्षणाबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत आदिवासी विकास विभागांतर्गत अनुसूचित जमातींसाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय योजना, सुविधा आणि सवलती गोरबंजारा समाजालाही लागू कराव्यात, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली आहे.

या मागण्यांसाठी समाजाच्या वतीने यापूर्वी अनेक आंदोलने, मोर्चे, उपोषणे आणि निवेदने देण्यात आली आहेत. या आंदोलनात समाजातील सर्व बांधव, भगिनी, युवक, सामाजिक संघटना तसेच समाजहितासाठी कार्य करणाऱ्या संस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण, आरक्षण अभ्यासक प्रा. मोहन चव्हाण, आत्माराम चव्हाण नायक (नागपूर), बी. डी. चव्हाण नायक (नागपूर), तांडा सुधार समितीचे अध्यक्ष प्रा. नामा जाधव, गोविंद राठोड, प्रकाश राठोड, गोर सेनेचे नागपूर उपविभागीय अध्यक्ष कैलास राठोड, गोर सेनेचे सचिव श्याम चव्हाण, नागपूर अध्यक्ष कुणाल जाधव, अकोला अध्यक्ष कुलदीप चव्हाण, दिनेश जाधव, राजू रताने, अरविंद पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षणाचा उत्साहात समारोप



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षणाचा समारोप अजनी येथील न्यू अपोस्टॉलिक हायस्कूल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. हे प्रशिक्षण १३ ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. समारोप समारंभाला शाळेच्या संचालिका डॉ. विनिता बावर, डॉ. वंदना बेंजामिन, केंद्र समन्वयक डॉ. उषा घटाटे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे समन्वयक डॉ. शैलेश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. नरेंद्र कामडी, अंशुल जिचकार, प्रमोद बालकोटे, मधुकर भगत, होमदेव डेकाटे, श्रीकांत आगरकर, जयश्री पिसे आणि सीमा देशमुख उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनात आणि ज्ञानदानात मोलाचे योगदान देणाऱ्या आठही तज्ज्ञ मार्गदर्शकांचा प्रशिक्षणार्थ्यांच्या वतीने विशेष भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मनोगत व्यक्त करताना प्रशिक्षणार्थ्यांनी या प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान, अनुभव आणि मार्गदर्शन भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. प्रशिक्षणादरम्यान विविध विषयांवर झालेल्या मार्गदर्शनामुळे अध्यापन कौशल्यात भर पडण्यासोबतच व्यावसायिक दृष्टिकोन अधिक व्यापक झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

आनंददायी वातावरणात, कृतज्ञता आणि उत्साहाच्या साक्षीने या प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी विशेष परिश्रम घेतले.

१,५०० रुपयांचा वार्षिक टोल पास कागदावरच?



दै. सिंहवाणी वृत्त, मौदा राष्ट्रीय महामार्गावरील टोल प्लाझापासून २० किलोमीटरच्या परिसरात राहणाऱ्या खासगी वाहनधारकांना १ नोव्हेंबरपासून वार्षिक १,५०० रुपयांचा टोल पास देण्याची घोषणा केंद्र सरकारने केली आहे. या निर्णयामुळे टोलच्या आर्थिक भुर्दंडातून दिलासा मिळण्याची अपेक्षा स्थानिक नागरिकांना होती. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप सुरू न झाल्याने ही योजना केवळ कागदावरच राहिल्याचे चित्र माथणी टोल प्लाझावर दिसून येत आहे.

स्थानिक वाहनधारक वार्षिक पास काढण्यासाठी माथणी टोल प्लाझावर गेले असता, प्रशासनाकडून पास देण्यास नकार देण्यात आला. यासंदर्भात विचारणा केली असता, टोल प्लाझा इन्चार्ज सय्यद यांनी सांगितले की, "वार्षिक १,५०० रुपयांच्या टोल पासबाबत शासनाची घोषणा झाली असली तरी आमच्याकडे अद्याप कोणतेही अधिकृत आदेश किंवा सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. शासनाकडून लेखी आदेश मिळाल्यानंतरच पास देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल."

काय आहेत शासनाचे अधिकृत नियम ?

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (टङ्खफ्ळ्ल्) अधिसूचनेनुसार, टोल प्लाझाच्या २० कि.मी. परिसरात राहणाऱ्या रहिवाशांच्या खासगी (बिगर-व्यावसायिक) कार, जीप किंवा व्हॅनला सक्रिय

शासनाच्या घोषणेनंतरही माथणी टोल प्रशासनाकडे आदेशच नाहीत

FASTag असल्यास हा पास मिळू शकतो. टोल प्लाझा शहर हद्दीबाहेर असल्यास १,५०० आणि हद्दीत असल्यास ३,००० शुल्क आहे. मात्र, ज्या ठिकाणी सर्व्हिस रोड किंवा पयार्यी रस्ता उपलब्ध आहे, तेथे हा पास दिला जात नाही. तसेच १ डिसेंबरपासून 'राजमार्गयात्रा' ॲपद्वारे ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा सुरू होणार आहे.

एकीकडे शासनाने नियम जाहीर केले असले तरी दुसरीकडे स्थानिक टोल नाक्यावर आदेशच नसल्याने प्रवाशांमध्ये संभ्रम आणि नाराजी पसरली आहे. शासनाने केवळ घोषणा न करता माथणीसह राज्यातील सर्व पात्र टोल प्लाझांना तातडीने लेखी आदेश जारी करावेत, अशी जोरदार मागणी स्थानिक वाहनधारकांकडून होत आहे.

कुणबी समाज पश्चिम नागपूरचा भव्य वधू-वर परिचय मेळावा व ज्येष्ठांचा सत्कार सोहळा संपन्न

समाजातील विवाहयोग्य युवक- युवतींना व्यासपीठ; ज्येष्ठांचा सन्मान, समाज एकतेचा संदेश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर खैरे कुणबी समाज, पश्चिम नागपूर यांच्या वतीने २२ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेला भव्य वधू-वर परिचय मेळावा, ज्येष्ठांचा सत्कार सोहळा व स्नेहमिलन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला समाज बांधवांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना एकमेकांची ओळख करून देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच समाजातील ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या परिचय मेळाव्यात विवाहयोग्य वधू-वरांनी आपला परिचय उपस्थित समाजबांधवां



समोर करून दिला. विवाह इच्छुक युवक- युवतींना योग्य जीवनसाथी निवडण्यासाठी अशा प्रकारचे सामाजिक व्यासपीठ अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत असून, समाजातील कुटुंबांना एकमेकांशी जोडण्याचे कार्यही या माध्यमातून होत आहे. युवक-युवतींच्या उज्ज्वल भविष्यासाठी समाजातील उपस्थितांनी शुभेच्छा व आशीर्वाद दिले. कार्यक्रमा दरम्यान समाजाला योग्य दिशा देणाऱ्या, सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

ज्येष्ठांचा सन्मान हा समाजाच्या संस्कारांचा, परंपरेचा आणि कृतज्ञतेचा प्रतीक असल्याने या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. ज्येष्ठांच्या अनुभवातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावी आणि समाजात एकता, सलोखा व परस्पर सहकार्याची भावना दृढ व्हावी, हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश होता. या सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, प्रमुख पाहुण्यांचे, समाज प्रतिनिधींचे, ज्येष्ठ नागरिकांचे तसेच सहकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आर्थिक, शारीरिक, वैचारिक तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात सहकार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या योगदानामुळे हा सोहळा यशस्वी झाल्याचे आयोजकांनी नमूद केले. दरम्यान, कार्यक्रमाच्या वेळेच्या मर्यादा आणि काही अपरिहार्य अडचणींमुळे इच्छा असूनही काही मान्यवर व ज्येष्ठांचा सत्कार करता आला नाही. याबद्दल आयोजकांनी दिलगिरी व्यक्त करत, संबंधित सर्वांचा सन्मान मनात कायम असून त्यांनी क्षमा करावी, अशी नम्र विनंती केली.

समाजातील युवक- युवती, ज्येष्ठ नागरिक, कुटुंबे आणि विविध क्षेत्रांतील व्यक्तींना एकाच व्यासपीठावर आणणारा हा परिचय मेळावा सामाजिक एकात्मता, आपुलकी आणि सहकार्याची भावना वृद्धिंगत करणारा ठरला. समाजच्या पुढील वाटचालीतही सर्व समाजबांधवांनी प्रेम, सहकार्य व आशीर्वाद देत अशाच प्रकारे सहभागी व्हावे, असे आवाहन खैरे कुणबी समाज, पश्चिम नागपूरच्या आयोजकांनी केले.

थोडक्यात

महाराष्ट्रातील पहिला 'बल्लवाचार्य पुरस्कार' नागपूरचे सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांना!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्राच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीचा वारसा जपणाऱ्या आणि आपल्या पाककलेच्या माध्यमातून भारतीय खाद्यपरंपरेला



जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देणाऱ्या नागपूरचे सुप्रसिद्ध शेफ, जागतिक विक्रमवीर आणि 'विष्णुजी की रसोई'चे संस्थापक शेफ विष्णू मनोहर यांना महाराष्ट्रातील पहिला मानाचा 'बल्लवाचार्य पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातील श्री गणेश सभागृह, खिलारे रोड, एरंडवणे येथे पुणे गेस्ट हाऊसच्या वतीने हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.

गेल्या चार दशकांहून अधिक काळ खाद्यविश्वात कार्यरत असलेल्या शेफ विष्णू मनोहर यांनी पारंपरिक भारतीय पाककलेचा प्रचार आणि प्रसार करताना अनेक जागतिक विक्रमांची नोंद केली आहे. विविध खाद्यपदार्थांच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, परंपरा आणि प्रादेशिक खाद्यवैविध्य जगभर पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या या बहुआयामी योगदानाचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून होत आहे. या कार्यक्रमाला चितळे बंधू उद्योग समूहाचे श्री. श्रीकृष्ण चितळे यांच्यासह उल्हासदादा पवार, वाडेश्वर ग्रुप ऑफ हॉटेल्सचे श्री. श्रीराम भावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पुणे गेस्ट हाऊसचे संचालक सनत, अभय व डॉ. किशोर सरपोतदार यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम होत आहे.

'मीठ खाल्लेला माणूस' या रहस्यप्रधान नाटकाच्या सादरीकरणाने

६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला नागपुरात प्रारंभ



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२६-२७ च्या नागपूर केंद्रावरील प्राथमिक फेरीला सोमवारी प्रारंभ झाला. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ रंगकर्मी किशोर आयलवार, महेश पातुरकर, नाट्य परिषद महानगर अध्यक्ष सलीम शेख, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे सहाय्यक संचालक संदीप शेंडे आणि वसंत खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलन करून झाले. यावेळी मान्यवरांनी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

शाम आस्करकर लिखित आणि दिग्दर्शित व वत्सल क्रिएशन सांस्कृतिक मंडळ, नागपूर प्रस्तुत 'मीठ खाल्लेला माणूस' या दोन अंकी नाटकाच्या सादरीकरण स्पर्धेला प्रारंभ झाला. पारिवारिक, सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमीवर आधारित या नाटकाला रहस्याची सुरेख झालर असलेल्या या नाटकात अत्यंत गुंतागुंतीच्या या खून प्रकरणाचा तपास, क्राइम ब्रँचमधून आलेले हुशार इन्स्पेक्टर विजय या प्रकरणाचा छडा कसा लावतात, अशी अत्यंत उत्कंठावर्धक मांडणी करण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत नाटकाचे दिग्दर्शन करण्यात आले. संवादपेक्षा हावभाव, संगीत आणि प्रकाशयोजनेचा अधिक प्रभावी वापर हे या नाटकाचे वैशिष्ट्य ठरले. वेगवान कथानक, अनपेक्षित वळणे आणि रहस्यपूर्ण घडामोडींमुळे नाटकाने प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले.

नाटकात हृषाली काईलकर, आकाश दूधनकर, हेमंत मानकर, बिस्मार्क भिवगडे, वैभव शिपोरकर, अनन्या बनसोड, भक्ती उबाळे, सुशील सरोदे, अनिल प्रजापती, दीपक कट्यारमल आणि राजू पुसदेकर यांनी विविध भूमिका साकारल्या. रावसाहेब पटवर्धन आणि इन्स्पेक्टर अशा दुहेरी भूमिकेत शाम आस्करकर यांनी प्रभावी अभिनय केला. नाटकाचे संगीत अमित कुबडे, रंगभूषा लालजी श्रीवास, नेपथ्य सतीश काळबांडे, वेशभूषा शुभांगी सरोदे यांनी सांभाळली, तर रंगमंच व्यवस्था मोहन गिरी यांनी पाहिली. या नाटकाला स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नंदनवन यांचे विशेष सहकार्य लाभले.

टेंभुरडोह येथे ३४ वर्षीय युवकाची आत्महत्या

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

पोलीस स्टेशन खापा हद्दीतील टेंभुरडोह येथे दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेतल्याची दुर्दैवी



घटना घडली.मृताकाचे नाव शिवकुमार धनराज सोनबावणे (वय ३४, रा. टेंभुरडोह, ता. सावनेर, जि. नागपूर) असे आहे. घटनेची माहिती गावातील नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. हितेश बनसोड यांनी तात्काळ खापा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे यांना माहिती दिली. माहिती मिळताच खापा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा केल्यानंतर हितज्योती आधार फाउंडेशनच्या अॅम्ब्युलन्सद्वारे मृतदेह सावनेर येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुढील तपास खापा पोलीस करीत आहेत.

रामगिरीच्या टेकडीवर साकारणार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भव्य बुद्धवन!

कळमेश्वर तालुक्यातील शांतिचा संदेश देणाऱ्या श्रद्धास्थानासाठी आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांचा पुढाकार, आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या २०२५-२०२६ आमदार निधीतून २ कोटींची विकासकामे मंजूर व २५ कोटींचा व्यापक विकास आराखडा महाराष्ट्र शासनाकडे प्रस्तावित, जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धाची गरज

५० फुटांची भव्य ध्यानमुद्रेतील बुद्धमूर्ती, ध्यान मंदिर, भक्त निवास, डिजिटल लायब्ररी, लेझर शोसह विविध सुविधांचे अतिशय बारकाईने नियोजन



दै. सिंहवाणी वृत्त, रामगिरी (ता. कळमेश्वर)

हिरवाईने नटलेली टेकडी, शांत वातावरण आणि निसर्गाचे सान्निध्य लाभलेली कळमेश्वर तालुक्यातील मोहपा परिसरातील रामगिरी टेकडी म्हणजेच रामगिरी बुद्धवन हे लाखो बौद्ध अनुयायांचे श्रद्धास्थान आहे. दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला येथे लाखो अनुयायी एकत्र येऊन भगवान गौतम बुद्धांना वंदन करतात. अशा या पवित्र आणि ऐतिहासिक महत्त्व असलेल्या स्थळाचा नियोजनबद्ध विकास व्हावा, हे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न आता आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या पुढाकारातून साकारण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

त्याचेच एक विकसित पाऊल म्हणजे रामगिरी बुद्धवनाच्या विकासासाठी आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी सन २०२५-२६ च्या आमदार स्थानिक विकास निधीतून तब्बल २ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यासोबतच त्यांच्या संकल्पनेतून बुद्धवनाच्या सर्वांगीण विकासासाठी २५ कोटी रुपयांचा व्यापक विकास आराखडा शासनाकडे प्रस्तावित करण्यात आला आहे. या आराखड्याला शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर



विविध विकासकामांचा मार्ग मोकळा होणार आहे त्यासाठी आमदार डॉ. आशिषराव देशमुख सातत्याने शासनकडे पाठपुरावा करीत आहेत.

आमदार निधीतून २ कोटींची चार महत्त्वपूर्ण कामे-

आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या २ कोटी रुपयांचा निधीतून रामगिरी बुद्धवन परिसरात पुढील कामे प्रस्तावित आहे -

१. शासकीय जागेवर सामाजिक केंद्राचे बांधकाम - ५० लाख रुपये.

२. सामाजिक केंद्रासाठी संरक्षण भिंतीचे बांधकाम - ५० लाख रुपये.

३. बुद्धवन परिसरात रस्त्याचे बांधकाम - ५० लाख रुपये.

४. बुद्धवन परिसराचे सुशोभीकरण - ५० लाख रुपये.

अशा चार विकासकामांसाठी प्रत्येकी ५० लाख रुपये याप्रमाणे एकूण २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, या कामांना लवकरच सुरुवात होणार आहे.

२५ कोटींच्या विकास आराखड्यातून बुद्धवनाला मिळणार नवी ओळख-

रामगिरी बुद्धवनाला जागतिक स्तरावरील बौद्ध पर्यटन आणि चिंतन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या संकल्पनेतून शासनाकडे २५ कोटी रुपयांचा विकास आराखडा सादर करण्यात आला आहे. या आराखड्यात रामगिरी बुद्धवनाकडे जाणारा रुंद सिमेंट काँक्रीटचा पोहोच मार्ग, भव्य ध्यान मंदिर, परिसरातील अंतर्गत रस्ते, आकर्षक उद्यान व बगीचा, भव्य प्रवेशद्वार, भक्त निवास, उपहारगृह तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याची माहिती देणारी अत्याधुनिक डिजिटल लायब्ररी अशा विविध सुविधांचा समावेश आहे.

५० फुटांची ध्यानमुद्रेतील भव्य बुद्धमूर्ती ठरणार मुख्य आकर्षण-

या संपूर्ण प्रकल्पातील सर्वात महत्त्वाचे आकर्षण म्हणजे टेकडीवर उभारण्यात येणारी ५० फुटांची ध्यानमुद्रेतील भव्य भगवान गौतम बुद्धांची मूर्ती. या करिता २ कोटी रुपये लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल.ही मूर्ती रामगिरी टेकडीची नवी ओळख ठरण्याबरोबरच दूरवरूनही नजरेस पडेल, अशा स्वरूपात उभारण्याचे नियोजन आहे. परिसरात आकर्षक लँडस्केपिंग करून ध्यान, चिंतन आणि मानसिक शांततेसाठी निसर्गरम्य वातावरण निर्माण केले जाणार आहे.

लेझर शोमधून डॉ. बाबासाहेबांचे जीवनकार्य उलगडणार-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, संघर्षमय जीवनप्रवास आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी दिलेले योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अत्याधुनिक लेझर लाईट अँड शोची व्यवस्था करण्याचेही नियोजन आहे. या माध्यमातून बाबासाहेबांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंग आणि त्यांचे विचार प्रभावीपणे सादर केले जाणार आहेत. भगवान गौतम बुद्धांचे प्रेम, अहिंसा, करुणा आणि शांततेचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य या प्रकल्पातून साध्य करण्याचा प्रयत्न आहे.

जगाला युद्धाची नव्हे, तर बुद्धांच्या विचारांची गरज!

या आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या संकल्पनेमागे भगवान गौतम बुद्धांचे शांतता, समता, करुणा आणि मानवतेचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. आज जगात वाढत असलेल्या संघर्षांच्या पार्श्वभूमीवर बुद्धांच्या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. रामगिरी बुद्धवन हे केवळ पर्यटनस्थळ न राहता सामाजिक प्रबोधन, आध्यात्मिक चिंतन, ज्ञान आणि मानवतेच्या मूल्यांचे केंद्र म्हणून विकसित व्हावे, अशी या प्रकल्पामागील संकल्पना आहे.

आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या पुढाकारातून २ कोटी रुपयांच्या आमदार निधीतील कामांना चालना मिळाली असून, २५ कोटींच्या व्यापक विकास आराखड्याच्या माध्यमातून रामगिरी बुद्धवनाच्या विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. या प्रकल्पामुळे रामगिरी बुद्धवनाला नवी ओळख मिळण्यासोबतच परिसरातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यटनविषयक उपक्रमांनाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

नागपुरात पहिल्यांदाच आयोजित 'ऑरेंज सिटी फाउंटेन पेन शो २०२६', लेखन संस्कृतीचा महाकुंभ

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ऑरेंज सिटी अक्षर फाउंडेशन आणि चित्रकला महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, आगामी २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी चित्रकला महाविद्यालय, दीक्षाभूमी येथे भव्य 'ऑरेंज सिटी फाउंटेन पेन शो २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. मध्य भारतात पहिल्यांदाच होत असलेल्या या प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट डिजिटल युगात हरवत चाललेल्या लेखणीच्या जादूला पुन्हा एकदा लोकांसमोर आणणे आणि पर्यावरणपूरक लेखन साहित्याचा प्रसार करणे हे आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत संयोजक व्हीएमव्ही महाविद्यालयाचे प्राचार्य अभय मुद्गल यांनी दिली.

या पेन शोचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे कला संचालक डॉक्टर किशोर इंगळे यांच्या हस्ते होणार आहे. या शोमध्ये विदेशातील नामांकित पेन आणि स्टेशनरी निर्माते यांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने आसा, रंगा, मोही, लोटस, वझीर, एलिका, व्हिंटेज रायटिंग



इन्स्ट्रुमेंट्स, पेन बुटीक नागपूर, ला पेन्स व्हिंटेज पेन्स, लिखित तसेच अनेक दिग्गज फाउंटेन पेन निर्माते व विक्रेते यांचा समावेश आहे. येथे विद्यार्थी आणि संग्राहकांना दुर्मिळ, विंटेज आणि हस्तनिर्मित पेने पाहण्याची व खरेदी करण्याची संधी मिळेल. देशातील नामांकित 'निब मिस्टर' समीर मेहता यांच्यासह पेन क्षेत्रातील प्रसिद्ध तज्ज्ञ युसूफ मन्सूर या शोमध्ये विशेष उपस्थित राहणार आहेत. ते जुन्या पेनांची दुरुस्ती, निबचे कस्टमायझेशन आणि शाईचा प्रवाह सुरळीत कसा ठेवावा याचे जिवंत प्रात्यक्षिक दाखवतील व मार्गदर्शन करतील.

तज्ज्ञ सुलेखनकारांच्या मार्गदर्शनाखाली बेसिक आणि अँडव्हान्स्ड कॅलिग्राफीचे विशेष प्रदर्शन चालवले जातील. यात मॉडर्न ब्रश लेटरिंग आणि कर्सिव्ह रायटिंगच्या आधुनिक तंत्रांचे प्रशिक्षण दिले जाईल.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तसेच हौशी कलाकारांसाठी खुल्या कॅलिग्राफी आणि हस्तलेखन स्पर्धा आयोजित केल्या आहेत. परीक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षराचे विश्लेषण करून त्यात सुधारणेसाठी वैयक्तिक मार्गदर्शन केले जाईल. तसेच विजेत्यांना आकर्षक बक्षीसे दिले जातील.

तज्ज्ञ मार्गदर्शक 'पेन थेरपी' द्वारे तणावमुक्ती आणि एकाग्रता वाढवण्याचे महत्त्व पटवून देतील. पेन आणि कागदाचा नियमित वापर करून मानसिक आरोग्य आणि विचारक्षमता कशी सुधारावी, याचे थेट अनुभव या सत्रात घेता येतील.

आजच्या घडीला वाढता प्लास्टिकचा कचरा रोखण्यासाठी शाश्वत पर्यायांची नितांत गरज आहे. 'युज अँड थ्रो' पेनांच्या तुलनेत फाउंटेन पेन आणि त्याचे रिफिल करण्यायोग्य शाईचे पर्याय हे अत्यंत पर्यावरणपूरक असतात. या शोच्या माध्यमातून लोकांना फाउंटेन पेनच्या वापरामुळे होणाऱ्या दीर्घकालीन फायद्यांची आणि कचरा निर्मूलनातील भूमिकेची जाणीव करून दिली जाईल. सततचे स्क्रीन टाइमिंग आणि मोबाईल-लॅपटॉपवरील टायपिंगच्या सवयींमुळे नवीन पिढीचे हस्ताक्षर दुरावत चालले आहे. हाताने लिहिल्यामुळे स्मरणशक्ती वाढते आणि विचारांमध्ये स्पष्टता येते, हे वैज्ञानिक सत्य अधोरेखित करण्यासाठी येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेला शासकीय चित्रकला महाविद्यालयाचे अधिष्ठाता विश्वनाथ साबळे, संयोजक डॉ. अतीष बकाने व डॉ. पायल गोटेफोडे यांची उपस्थिती होती.

उमरी जवळ अज्ञात वाहनाची पादचाऱ्यास धडक; इसम गंभीर जखमी, हात-पाय फ्रॅक्चर



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजताच्या सुमारास पोलीस स्टेशन केळवद हद्दीत येणाऱ्या उमरी जवळ रस्ता ओलांडत असलेल्या पादचाऱ्यास अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात फागुजी भाटू डिवू (रा. रामकोना) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या हाताला व पायाला फ्रॅक्चर झाले आहे.

घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर यांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर हितेश बनसोड यांच्या मदतीने जखमी फागुजी डिवू यांना सावनेर येथील शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्यांना नागपूर येथील मेडिकल हॉस्पिटलमध्ये रवाना केले.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस तसेच केळवद पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघात करून पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा पोलीस शोध घेत असून पुढील तपास केळवद पोलीस करीत आहेत. अपघातग्रस्तांना तातडीने अभिषेक कोठाडे यांनी मदत केली.

'पंचलेट' एकांकिकेने २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचे उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कला सागरच्या वतीने आणि विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनाच्या सहकार्याने आयोजित २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचे उद्घाटन सोमवारी सीताबर्डी येथील मोर हिंदी भवन परिसरातील स्व. रामगोपाल माहेश्वरी सांस्कृतिक सभागृहात 'पंचलेट' या एकांकिकेच्या सादरीकरणाने झाले.

सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे लोकपाल शरद त्रिवेदी, इंद्रायणी टीव्हीएसचे



व्यवस्थापकीय संचालक विलास हरडे, एस्सेन्स इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचे संचालक विजय मेनन, कला सागरचे मुख्य संरक्षक व सचिव पदम नायर, अध्यक्ष रविशेखर गिल्लूरकर, कार्याध्यक्ष सुशील तिवारी, उपाध्यक्ष रवींद्र बिजवे आणि कोषाध्यक्ष डॉ. रमेश बारस्कर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. परीक्षक अपर्णा लखमापूर, रमेश लखमापूर आणि शक्ती रतन यांचीदेखील यावेळी उपस्थिती होती.

मान्यवरांनी महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक पदम नायर यांनी केले. श्रीकृष्ण नृत्यालयाच्या प्रमिला उन्नीकृष्णन यांच्या विद्यार्थींनी



अदिती पाहूरकर, हांसिनी वेल्लामिल्ली, आरोही धोटे आणि सत्विका अनिपेड्डी यांनी भरतनाट्यम् सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सुशील तिवारी यांनी केले.

उद्घाटनानंतर विदर्भ राष्ट्रभाषा प्रचार समिती, राष्ट्रभाषा भवन, सीताबर्डी यांच्या वतीने मयूर मानकर दिग्दर्शित 'पंचलेट' ही हिंदी एकांकिका सादर करण्यात आली. गावात आलेला पंचलाइट पेटवता येत नसल्यामुळे निर्माण होणारा गोंधळ, गावकऱ्यांचा अहंकार, प्रतिष्ठेचा प्रश्न आणि त्यातून घडणारे विनोदी प्रसंग या एकांकिकेतून प्रभावीपणे मांडण्यात आले.

आज बहुभाषी महोत्सवात

६.१५ वाजता - देवरावजी कुबडे सेवा प्रतिष्ठान प्रस्तुत 'ओमेगा - बियॉंड ह्युमन' एकांकिका

७.३० वाजता - ओम प्रॉडक्शन प्रस्तुत 'इन्सानियत गिर गई है'